cmyk

## संपादकीय

### गोल्ड लोन्सच्या सुळसुळाटावर नियंत्रण हवेच

अमेरिका व चीन यांच्यातील व्यापारयुद्धामुळे जागतिक पातळीवर निर्माण झालेली अनिश्चितता आणि कमकुवत झालेला डॉलर यामुळे सोन्याच्या भावात तेजीची झळाळी आली आहे. दहा ग्रॅम सोने एक लाख रुपयांच्या वर जाऊन पोहोचले आहे. यंदाच्या वर्षात सोन्याच्या भावात प्रति दहा ग्रॅमला वीस हजार रुपये, म्हणजे २६ टक्के इतकी वाढ झाली आहे. चांदीचा भावही ९८ हजार रुपयांवर प्रति किलोला गेला आहे. जागतिक बाजारात सोन्याचा भाव प्रतिऔंस ३,३९७ डॉलर या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### चार दिवसांनंतरही बीएसएफ जवानाची सुटका नाही

नवी दिल्लीः पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यातील भारत–पाकिस्तान सीमेवरून अटक करण्यात आलेला बीएसएफ जवान पी.के. साहू अजूनही पाकिस्तानी रेंजर्सच्या ताब्यात आहे. घटनेला चार दिवस उलटून गेले आहेत आणि तीन ध्वज बैठका झाल्या आहेत, परंतु सैनिकाची सुटका होऊ शकली नाही. यावर पाकिस्तानी रेंजर्स म्हणाले की, जोपर्यंत हायकमांडकडून सूचना मिळत नाहीत तोपर्यंत सैनिकाला सोडू शकत नाहीत. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शुक्रवारी संध्याकाळी बीएसएफचे महासंचालक (डीजी) दलजित सिंग चौधरी यांनीही केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांच्याशी याबाबत चर्चा केली आणि उच्च पातळीवर हा मुद्दा उपस्थित केला आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–०९ | सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# पंजाबातील शेतकऱ्यांना ४८ तासात शेत खाली करण्याचे आदेश

## लष्कराच्या आदेशाने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण

चंदिगढ । वृत्तसंस्था

पंजाबमधील सीमेलगतच्या गावांमध्ये शेतकऱ्यांना विशेष परवानगी घेऊन शेती करण्याची परवानगी आहे. पीक पेरणी आणि कापणीच्या वेळी जवान त्यांच्यासोबत तैनात असतात. तारेचे कुंपण हे शून्य रेषेच्या खूप आधी आहे. शून्य रेषेवर फक्त खांब आहेत. बीएसएफने शेतकऱ्यांना ४८ तासांत गव्हाची कापणी करुन शेत खाली करण्याचे आदेश दिले आहेत. गुरुद्वारातून याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.



**वेळेत कापणी न केल्यास गेट बंद केले जातील, असे सांगण्यात आले आहे. या आदेशामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. या हल्ल्यानंतर पंजाबमधील भारत–पाकिस्तान सीमेवर अलर्ट जारी करण्यात आला आहे. जवानांनी सुरक्षा आणि गस्त वाढवली आहे. दरम्यान, सीमेवरील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आदेश देखील देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी कुंपणाजवळ लावलेली गव्हाची कापणी दोन दिवसांत पूर्ण करुन शेत खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अमृतसर, फिरोजपूर,

पान २ वर

### बिनविरोध निवडणुकीला मत टक्क्यांची अट लागू होणार?

मुंबई । प्रतिनिधी


**सर्वोच्च न्यायालयात एका याचिकेवर सुरू असलेल्या सुनावणीने देशाचे लक्ष वेधले आहे. कारण, आजवर कधीही चर्चेत न आलेला निवडणुकीशी संबंधित एक नवाच मुद्दा या याचिकेत चर्चेला आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या सुनावणीदरम्यान केंद्र सरकारला केलेली सूचना, हा या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.**

विधी सेंटर ऑफ लिगल पॉलिसी विरुद्ध केंद्र सरकार व इतर या खटल्याची सुनावणी न्या. सूर्यकांत, न्या. एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठापुढे सुरू आहे. विधी सेंटर ऑफ लिगल पॉलिसी या संस्थेने लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या कलम ५३(२) ला आव्हान दिले आहे. या कलमांतर्गत रिंगणात एकापेक्षा अधिक उमेदवार नसतील तर त्या उमेदवाराची बिनविरोध निवड होते. या तरतुदीला विधी संस्थेने आक्षेप

पान २ वर

# जो राग भारतीयांच्या मनात तोच राग संपुर्ण जगात!

## पहलगाम दशतवाद्यांना कठोरात कठोर उत्तर देणार–प्रधानमंत्री मोदी



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांना आणि कट रचणाऱ्यांना कठोरात कठोर उत्तर दिले जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२७ एप्रिल २०२५) त्यांच्या मासिक रेडिओ भाषणात 'मन की बात' मध्ये सांगितले.**

तीव्र दुःख व्यक्त करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, या घटनेने देशातील प्रत्येक नागरिकाला दुखावले आहे. ''प्रत्येक भारतीयाला पीडित कुटुंबांबद्दल तीव्र सहानुभूती आहे. तो कोणत्याही राज्याचा असो, कोणतीही भाषा बोलणारा असो, या हल्ल्यात ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, त्यांच्या वेदना जाणवत आहेत. दहशतवादी हल्ल्याचे फोटो पाहिल्यानंतर प्रत्येक भारतीयाचे रक्त खवळले आहे असे मला वाटते,'' असेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, या हल्ल्याने दहशतवादाच्या आश्रयदात्यांचा हताशपणा दाखवला आणि त्यांचा भ्याडपणा दाखवून दिला. हे अशा वेळी घडले जेव्हा काश्मीरमध्ये शांतता परत येत होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणाले की, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये चैतन्य होते, बांधकामांना अभूतपूर्व गती मिळाली होती, लोकशाही मजबूत होत होती, पर्यटकांची संख्या विक्रमी वेगाने वाढत होती, लोकांचे उत्पन्न वाढत होते, तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत होत्या देशाच्या शत्रूंना, जम्मू आणि काश्मीरच्या शत्रूंना हे आवडले नसल्याचा आरोपही यावेळी केली. दहशतवादी आणि दहशतवादाचे सूत्रधार काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करू इच्छितात आणि म्हणूनच त्यांनी इतका मोठा कट रचला.

> **नेते, लष्करी अधिकाऱ्यांच्या कुटूबियांचे पाकिस्तानातून पलायन**
>
> जम्मू–काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने घेतलेल्या निर्णायक आणि आक्रमक भूमिकेमुळे पाकिस्तानमध्ये मोठी घबराट पसरली आहे. देशातील राजकीय आणि लष्करी नेतृत्वही अस्वस्थ असून, त्यांचे कुटुंबीय परदेशी स्थलांतर करत आहेत. एका माहितीनुसार पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या कुटूंबियांनी देश सोडल्यानंतर आता बिलावल भुट्टो यांच्या कुटूंबियांनी देखील पाकिस्तान सोडून कॅनडात पलायन केले असल्याचे समजते.

> **भारताची क्षेपणास्त्र चाचणी**
>
> पहलगाम हल्ल्याच्या अवघ्या काही तासांत भारताने सूरत युद्धनौकेवरून एक क्षेपणास्त्र चाचणी केली. हा निर्णय पाकिस्तानला दिलेला स्पष्ट इशारा मानला जात आहे. तसेच रविवारी २७ एप्रिल रोजीही अरबी समुद्रातील युद्धनौकेवरून भारताने क्षेपणास्त्र चाचणी घेतली.

> **विरोधकांचाही सरकारला पाठिंबा**
>
> २६ जणांचा बळी घेतलेल्या पहलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली आहे. नागरिक सोशल मीडियावर, रस्त्यांवर आणि बातम्यांतून पंतप्रधान मोदींकडून पाकिस्तानविरोधात कठोर कारवाईची मागणी करत आहेत. यावर सर्वच राजकीय पक्षांनी एकमुखाने पंतप्रधान मोदींच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. विरोधकांनी स्पष्ट केले आहे की, सरकार कोणतेही पाऊल उचलो, आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत.

> **भारत सरकारने आतापर्यंतची केलेली कारवाई**
>
> सिंधू जल वाटप करार तात्पुरता स्थगित. शिमला कराराला स्थगिती. पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द. भारतातील पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचे आदेश. डिप्लोमॅटिक अधिकाऱ्यांमध्ये मोठी कपात. सैन्याची हालचाल आणि युद्ध सज्जतेसाठी तयारी.

दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात, देशाची एकता, १४० कोटी भारतीयांची एकता ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. ही एकता दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक लढाईचा आधार आहे. देशासमोर उभ्या राहिलेल्या या आव्हानाला तोंड देण्यासाठी आपल्याला आपला संकल्प बळकट करायचा आहे. एक राष्ट्र म्हणून आपल्याला प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी लागेल, असे आवाहनही यावेळी केले. शेवटी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश एका आवाजात बोलत आहे हे जग पाहत आहे. आम्हाला भारतीय जनतेला जो राग आहे, तोच राग संपूर्ण जगात आहे. या दहशतवादी हल्ल्यानंतर जगभरातून सतत शोक व्यक्त होत आहेत. जागतिक नेत्यांनी मलाही फोन केले आहेत; पत्रे लिहिली आहेत आणि संदेशही

पान २ वर

### पाकचे पाणी बंद केले नाही; सरकार जनतेची दिशाभूल करत आहे–प्रकाश आंबेडकर

शिर्डी । प्रतिनिधी

**भारताने पाकिस्तानचे पाणी बंद केलेले नाही, सरकार खोटेबोलत असून देशातील नागरिकांची दिशाभूल करत आहे. २४ एप्रिल रोजी केंद्रीय सचिवांनी पाकिस्तानला लिहिलेल्या पत्राचा दाखला देत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर प्रतंप्रधान नरेंद्र मोदींसोबत गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यानंतर, भारताने पाकिस्तानची कोंडी करणारे ५ महत्त्वाचे निर्णय घेतले.



त्यामध्ये, पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिल्याचे सांगण्यात आले. प्रकाश आंबेडकर यांनी पाकिस्तानला पाणी बंद केल्यासंदर्भाने दिलेले पत्रच त्यांनी दाखवले. या पत्रामध्ये कुठेही पाणी बंद केल्याचा उल्लेख नाही. धरणातील पाणी आम्ही सोडणार नाही, असा कुठेही उल्लेख नाही. याचाच अर्थ इंडस करार भारत सरकारने रद्द केलेला नाही, असे त्यांनी म्हटले. माझ्या भाषेत नरोबा कुंजोबा आणि कायद्याच्या भाषेत स्टेटस्को असे हे पत्र. त्यामुळे जनतेला हे पत्र दाखवले तर सरकार कुठल्या प्रकारची कारवाई करत आहे, हे समोर येईल. हा गंभीर मुद्दा असून शासनाने याकडे डोळे झाक करू नये. या सगळ्यात

पान २ वर



### मुस्लिमविरोधी वक्तव्यावर प्यारे खान यांचा नितेश राणेंना खडसावणारा इशारा

नागपूर । पतिनिधी

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी मंत्री नितेश राणे यांच्या मुस्लिमविरोधी वक्तव्यावर जोरदार टीका केली आहे. माध्यमांशी बोलताना प्यारे खान यांनी राणेंना इशारा देत म्हटले की, ''मुस्लिमांविरोधात वक्तव्य करण्यापूर्वी त्यांनी माहिती घ्यावी की, पर्यटकांच्या जीवाचे रक्षण करणारे कोण होते आणि कोणत्या धर्माचे होते.'' पुढे प्यारे खान म्हणाले, ''सध्या कश्मीरमध्ये मुस्लिम बांधव

पान २ वर

### देशाच्या एकतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड नाही; शरद पवार यांची स्पष्टोक्ती

बारामती । वृतसंस्था

**आज देश संकटात असताना कमतरतांवर चर्चा करण्याची वेळ नाही. काही लोक धार्मिक विचार देण्याचा विचार करत आहेत, जे देशासाठी अतिशय धोकादायक आहे. देशाच्या एकतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता येणार नाही. जेव्हा निवडणूक होईल तेव्हा बघू असे शरद पवार म्हणाले.**

पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हल्लेखोरांना सोडणार नाही असे वक्तव्य केले. तसेच या हल्ल्यानंतर



पाकिस्तानच्या विरोधात काही निर्णयही घेण्यात आले. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पहलगाम हल्ल्याप्रकरणी भूमिका स्पष्ट करत सुरक्षेच्या दृष्टीने ज्या कमतरता आहेत त्यावर आज चर्चा नको असे सांगत देश एकत्र ठेवणे महत्वाचे असल्याची भूमिका मांडली. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, भारतवासियांवर हल्ला झाला आहे. त्यामुळे राजकारणा मतभिन्नता

पान २ वर

### शहरांचा चेहरा बदलल्यास ५० टक्के लोकसंख्येला उत्तम जीवन – मुख्यमंत्री फडणवीस

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्राची ५० टक्के लोकसंख्या ५०० शहरात आणि उर्वरित लोकसंख्या ४० हजार गावात राहते आहे. शहरांचा चेहरा आपण बदलू शकल्यास ५० टक्के लोकसंख्येला उत्तम जीवन देऊ शकतो. यासाठी 'पुणे अर्बन डायलॉग' सारखे मंथन आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

यशदा, बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट, इंटरनॅशनल सेंटर आणि पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने



यशदा येथे आयोजित 'पुणे अर्बन डायलॉग–आव्हाने आणि उपाय' कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, विजय शिवतारे, बापुसाहेब पठारे, हेमंत रासने, माजी मुख्य सचिव डॉ.नितीन करीर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यशदाचे महासंचालक निरंजन सुधांशू, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा संपूर्ण विकास आराखडा रद्द करून पहिल्यांदा रस्त्यांचे जाळे निर्माण करायचे आणि नगर रचना योजनांचा उपयोग करण्याचा विचार आहे. आज आपण पीएमआरडीएच्या माध्यमातून भविष्यातील पुणे असलेले नवीन शहर अथवा वसाहत तयार करत असताना मोठे रस्ते आवश्यक आहेत. त्याचबरोबर नागरी वाहतूक

पान २ वर

### मध्य प्रदेशात कार विहिरीत कोसळून १० ठार

भोपाळ । वृत्तसंस्था

मध्य प्रदेशमधील मंदसौर जिल्ह्यातील नारायणगड येथे देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांची कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकीला धडकली आणि रस्त्याच्या बाजूला असलेल्या विहिरीत कोसळली. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. रविवारी दुपारी ही घटना घडली. दुचाकीस्वार गोबर सिंग (रा. आबाखेडी) याचा जागीच मृत्यू झाला. तर जखमींना वाचवण्यासाठी विहिरीत उतरलेल्या दोघांचा विषारी गॅसमुळे गुदमरून मृत्यू झाला. तीन वर्षांच्या मुलीसह चार जखमींना वाचवण्यात आले आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६१.०० क्विंटल | १,८५० | ३,००० | २,५११ |
| ज्वारी/हायब्रिड: ५१.५० क्विंटल | २,००० | ३,१२० | २,३१० |
| मका/लोकल: ४.५० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर: १६.०० क्विंटल | ६,००० | ६,६०० | ६,४४१ |
| उडीद: १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७४.०० क्विंटल | २,३०१ | २,९०६ | २,५२७ |
| मुग: ४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्व्हे करून घेण्याचे धनंजय मुंडेंचे आवाहन

## परळी तालुक्यात ३१६४ सर्व्हे पूर्ण; २६३४ सेल्फ तर ४९९ सर्व्हे ग्रामसेवकांच्या मार्फत पूर्ण

परळी वै.। प्रतिनिधी

**प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत किंवा स्वतःच्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून याची मुदत येते ३० एप्रिल रोजी संपणार असल्याने गरजू व पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी स्वतः ॲपवरून किंवा ग्रामसेवकाच्या मार्फत आपला सर्वे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन माजी मंत्री तसा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.**

परळी तालुक्यात आतापर्यंत ३१६४ लाभार्थींचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यापैकी २६३४ सर्व्हे हे नागरिकांनी स्वतः पूर्ण केले असून ४९९ सर्वे हे ग्रामसेवकांच्या मार्फत पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांनी दिली आहे. दरम्यान येत्या ३० एप्रिल रोजी सर्वे पूर्ण करण्याची मुदत संपणार असून त्याआधी पात्र असलेल्या गरजू नागरिकांनी आपल्या घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे. कागद पत्रांची किंवा त्रुटींची पूर्तता करण्यासाठी परळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मदत करणार असून कुणाला मदतीची आवश्यकता असल्यास त्यांनी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके यांना संपर्क करावा असे आवाहनही धनंजय मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे. याआधीही धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी नगर परिषदेने रमाई आवास सह विविध योजनेतून विक्रमी घरकुले मंजूर करून दिलेली आहेत.



cmyk

## अग्रलेख

# गोल्ड लोन्सच्या सुळसुळाटावर नियंत्रण हवेच

अमेरिका व चीन यांच्यातील व्यापारयुद्धामुळे जागतिक पातळीवर निर्माण झालेली अनिश्चितता आणि कमकुवत झालेला डॉलर यामुळे सोन्याच्या भावात तेजीची झळाळी आली आहे. दहा ग्रॅम सोने एक लाख रुपयांच्या वर जाऊन पोहोचले आहे. यंदाच्या वर्षात सोन्याच्या भावात प्रति दहा ग्रॅमला वीस हजार रुपये, म्हणजे २६ टक्के इतकी वाढ झाली आहे. चांदीचा भावही ९८ हजार रुपयांवर प्रति किलोला गेला आहे. जागतिक बाजारात सोन्याचा भाव प्रतिऔंस ३,३९७ डॉलर या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांची हकालपट्टी करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे डॉलरचे मूल्य तीन वर्षातील नीचांकी पातळीवर आले असून, सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून लोक सोन्याकडे पाहात आहेत. शिवाय व्याजदरात कपात होण्याची अपेक्षा हाही एक घटक कारणीभूत ठरलेला आहे. सोन्याच्या भावातील तेजीमुळे, सोने तारण ठेवून मोठ्या प्रमाणावर कर्ज उचलले जात आहे. बँका आणि नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या, म्हणजेच बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या देखील प्रचंड प्रमाणात गोल्ड लोन देत असून, त्यामुळे त्यांच्या एनपीए, म्हणजेच थकित कर्जांमध्ये वाढ झाली आहे. गोल्ड लोन्सवरील एनपीएमध्ये २८ टक्क्यांची वाढ झाली असून, येणे कर्जांत २७ टक्क्यांची वाढ झाली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये या कर्जाची थकबाकी ५,३०७ होती, ती आता ६,८२४ कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. या गोल्ड लोन्सच्या थकबाकीमध्ये व्यापारी बँकांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांची ही थकित रक्कम २,०४० कोटी रुपये असून, वित्तीय कंपन्यांची ४,७८४ कोटी रुपये इतकी थकबाकी आहे. भविष्यात असेच घडत राहिल्यास, या बँका व कंपन्या संकटात येऊ शकतात. बँकांनी आणि एनबीएफसीजनी ११ लाख ११ हजार कोटी रुपयांवर गोल्ड लोन्स दिलेली आहेत. हे प्रमाण मर्यादेबाहेर गेले असून, त्याबाबत केंद्रीय अर्थखात्याने देखील गंभीरपणे लक्ष घालण्याची गरज आहे. सोन्यावरील गहाणवट कर्ज देताना अनेकदा त्याचे चोख मूल्यांकन करावे लागते. सोने तारण म्हणून ठेवणाऱ्या ग्राहकाला बाजूला ठेवून, ते मूल्यांकन केले जाते. कधी कधी तिसऱ्याच कुठल्यातरी कंपनीकडून कर्जाचे मूल्यमापन केले जाते.

गोल्ड लोनचा वापर कर्जदार कशाप्रकारे करत आहे, याची अनेकदा पाहणीच केली जात नाही. कर्ज फेडण्यात ऋणको अयशस्वी ठरला, तर ते सोने किंवा सुवर्णालंकार यांचा लिलाव केला जातो. परंतु तो देखील बऱ्याचदा पारदर्शकपणे केला जात नाही. या सर्व कर्जव्यवहारात जी जोखीम असते, त्याचे चिकित्सकपणे मूल्यांकन केले जात नाही, अशा तक्रारी आहेत. म्हणूनच रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे. याबाबत बाहेरील व्यक्तींची वा कंपन्यांची सल्ला-सेवा घेण्यात येणार असेल, तर त्यावर गोल्ड लोन देणाऱ्या बँकेने अथवा एनबीएफसीने नियंत्रण ठेवले पाहिजे, अशी रिझर्व्ह बँकेने सूचना केली आहे. संबंधितांनी या सूचनेचे पालन केले पाहिजे. यापूर्वी अनेक ऋणको ९ ते १२ टक्के व्याज बँकांना देऊन, गहाण ठेवलेले दागदागिने पुन्हा गहाण ठेवत असत. मूळ मुद्दलाची रक्कम न देता, येणे कर्जाच्या रकमेत त्यामुळे वाढ होत असे. गेल्या सप्टेंबरमध्ये रिझर्व्ह बँकेने या संदर्भात बँका व एनबीएफसीजना आदेश दिले. परिणामी आता जर सोने फेरगहाण ठेवायचे असेल, तर ऋणकोंना मुद्दलाची पूर्ण रक्कम आणि व्याज द्यावे लागते. त्यानंतरच कर्जाची मुदत वाढवण्याची विनंती करता येते. तसेच सोने-चांदी किंवा एक्स्चेंज क्रेडिट फंड वा म्युच्युअल फंडांच्या युनिट्सच्या आधारे कोणताही ॲडव्हान्स देण्यास रिझर्व्ह बँकेने मज्जाव केला आहे. तसेच सोन्याच्या किमतीच्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त कर्ज देऊ नका, असेही बजावण्यात आले आहे. तसेच ऋणको जे सोने घेऊन बँकांकडे येतात, ते त्यांच्या मालकीचे आहे का, हेही पाहणे आवश्यक असते. सोने गहाण ठेवून कर्ज घेण्याची प्रवृत्ती का वाढली आहे याचे कारण म्हणजे, ती सहजपणे मिळतात. फारशा कागदपत्रांची आवश्यकता नसते. शिवाय हल्ली अनेकदा शेअर बाजार कोसळत असून, सोन्या-चांदीचा बाजार मात्र तेजीत असतो. त्यामुळे याचा फायदा घेण्यासाठी देखील सोने-चांदी तारणावर कर्ज घेण्याची प्रवृत्ती वाढलेली असावी. मुळात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती जानेवारी महिन्यातील अंदाजापेक्षा ३० आधारबिंदूंनी कमी केली आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात आपला विकास ६.२ टक्के होईल, असा होरा आहे. ट्रम्प यांच्या व्यापारविषयक धोरणांमुळे जागतिक अर्थव्यवस्था विद्यमान वर्षात केवळ २.८ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. याआधी जानेवारीमध्ये ३.३ टक्के विकासदर असेल, असे भाकित करण्यात आले होते. एकूणच जगात नरमाई येणार आहे. त्यामुळे भारतातील रोजगारावर तसेच लोकांच्या मिळकतीवर विपरीत परिणाम होणार आहे, अशी भीती आहे. म्हणूनच सुरक्षिततेचा उपाय म्हणून लोक सोन्यात अधिकाधिक पैसे गुंतवत आहेत. त्याचप्रमाणे आपल्या गरजा भागवण्यासाठी सोन्याच्या तारणावर कर्ज उचलत आहेत. परंतु त्यात असलेले धोकेही विचारात घेण्याची गरज आहे.

# समावेशन तत्काळ करा नसता सामुहीक आत्मदहन करणार

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी नगरपंचायत कार्यालय अंतर्गत समावेशन करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला होता परंतु जाणून-बुजून प्रस्ताव मध्ये काही किरकोळ त्रुटी असल्यामुळे प्रस्तावा परत पाठवण्यात आला होता. सदरील प्रस्ताव परत दुरुस्ती करून आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासनसंचालनालय सि.बी.डी. नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला होता. परंतु काही अधिकारी कर्मचारी जाणून-बुजून प्रस्ता मंजूर करण्यासाठी टाळाटाळ करीत आहे करता आत्मदहन करण्यासाठी २५ एप्रिल रोजी स्ममरण पत्र देण्यात आले आहे.

नवनिर्मित तीर्थपुरी नगरपंचायत मधील कार्यरत ग्रामपंचायतकालीनकर्मचारी समावेशन संदर्भातील आत्मदहना करणार असल्याचे निवेदना मार्फत करण्यात येत आहे . या प्रकरणी सविस्तर माहिती अशी की १७/०४/२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय,छत्रपतीसंभाजीनगर नगरपालीका प्रशासन विभाग व संचालनालय मुंबई यांच्या वर पाठविलेले निवेदन. आ.हिकमतदादा उढाण सदस्य विधानसभा घनसावंगी मतदारसंघ यांचे पत्र पण देण्यात आले. तीर्थपुरी नगरपंचायत येथे कार्यरतग्रा.प.कालीन कर्मचारी समावेशन करणे करिता प्रस्ताव यापुर्वी दिनाक ०५/०६/२०२३ रोजीआपले कार्यालयात सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाने वेळोवेळी त्रुटी पूर्तता करण्या बाबत कळविले असता, त्या बाबतची त्रुटीपुर्तता वेळोवेळी सदर कार्यालयात करण्यात आलेली आहे.मा.जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने दि.२९/०५/२०२४ रोजी मा.विभागीय आयुक्त ,छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे त्रुटी पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव मुळ कागदपत्रासह सादर करण्यात आलेला आहे. तसेच मा.आयुक्त तथासंचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय सि.बी.डी.नवी मुंबई यांनी ०३ मार्च २०२५ रोजी आपल्या कार्यालयास तीर्थपुरी नगरपंचायत मधील कार्यरतग्रामपंचायतकालीन कर्मचारी यांचे नवनिर्मित नगरपंचायत मध्ये समावेशनकरण्यासंदर्भात मार्गदर्शनपर परिपत्रक निर्गमित केलेले आहे. त्या अनुषंगाने १७/०४/२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संभाजीनगर व संचालनालय मुंबई यांच्या मेल वर अधिकृत रित्या समावेशनासंदर्भात होत नसल्यामुळे सामुहिक आत्मदहन बाबत कळविण्यात आले आहे. व छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय येथे आवक-जावक विभागात दिनांक. २३/०४/२०२५ रोजी सदर निवेदनाची देण्यात आली आहे. यासंदर्भात अद्याप ही सदर निवेदना बाबत आपल्या कार्यालया कडुन कोणतीही कार्यवाही झालेलीनाही. म्हणून ३०/०४/२०२५ पर्यंत आमचे समावेशन न झाल्यास दिनांक ०१/०५/२०२५ रोजी कामगारदिनी रोजीआम्ही कर्मचारी नगर पंचायत कार्यालय तीर्थपुरी येथे सामुहीक आत्मदहन करणार असुन, सदर आत्मदहनास वरील वरिष्ठ कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहील. याची गांभीर्यपुर्वक नोंद घेण्यात यावे असे निवेदना मार्फत करण्यात आले आहे. दत्ता काशीनाथ वाघ , संतोष नारायण लवनाडे,गणेश श्रीमंत मोरे, आकाशगणेशराव नारळे ,किशोरहरिभाऊ जाधव, जितेंद्रकुमार माणिकराव गाढेकर, सोपान तुळशीराम कडुकर , सुरेश रामदास मस्कावदे,ज्ञानेश्वरअच्युत बोबडे, प्रभाकर विश्वनाथ पाटील राजेंद्र विष्णु कडुकर, रामेश्वर लक्ष्मण कासार, विकास वसंत साबळे, यांच्या निवेदनावरील स्वाक्षऱ्या आहे.

# मंजरथ रोड रुंदीकरणात न.प. कर्मचाऱ्यांच्या अतिक्रमणांना संरक्षण;कुठे आहे न.प.चे सर्व्हेक्षण?

**माजलगाव । प्रतिनिधी**

**काशी नंतर माजलगाव तालुक्यातील मंजरथला दक्षीण काशी समजल्या जाणाऱ्या मंजरथला तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आल्याने तेथे जाण्यासाठी नवीन रस्त्याच्या रुंदीकरणासाठी माजलगाव न.प.च्या हद्दीत असलेल्या पंचशील नगर ,इंदीरा नगर भागातील नागरिकांनी केलेली अतिक्रमणे हटवण्याचे काम न.प.प्रशासनाकडुन करत असताना सामान्य नागरिकांची अतिक्रमणे पाडली जाताहेत पण न.प.चे कर्मचाऱ्यांचै अतिक्रमणांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करीत समानतेने त्यांचीही अतिक्रमणे पाडण्याच्या मागणीचे निवेदन सुहास टाकणखार, राजेंद्र जावळे, धनंजय जावळे यांनी मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री यांच्या सह जिल्हाधिकारी बीड यांनी दिले होते. यात कागदी घोडे नाचवण्या पलीकडे काहिच ठोस निर्णय न.प.च्या मुख्याधिकाऱ्यांकडुन घेण्यात न आल्याने संताप व्यक्त करत संबंधित निवेदनकर्त्यांनी दि २५ एप्रिल रोजी काम बंद केले.**



सदरील रोडचे विस्तारीकरण होत नसल्याचे २४ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आल्या नंतर मुख्याधिकारी यांनी सांगितले होते की,संबंधीत इंजीनिअर सोबत चर्चा करुन तांत्रीक दुरुस्ती करुन त्यानुसार रुंदीकरणात येणारी अतिक्रमणे पाडली जातील असे आश्वासन दिले त्यानुसार इंजीनिअर यांनी सुद्धा तेच आश्वासन दिले होते.त्यात त्यांनी सांगितले होते कि,सदरील भागातील अण्णाभाऊ साठे चौका पासुन पुढे दक्षीण,उत्तर दिशेवरील दोन हि बाजुला असलेल्या प्लॉटिंगची मोजणी करुन ६० फुटांच्या रस्त्याचे सेंटर काढून त्या प्रमाणे अतिक्रमणे पाडली जातील.पण मोजणी करणारेच न.प.चे कर्मचारी आहेत ज्यांची अतिक्रमणे सेंटरच्या सिमा रेषेत येतात म्हणुन त्यांनी त्यांच्या अनाधिकृत जागा सोडुन उत्तर दिशेने जास्तीचे मार्क आऊट टाकले आहे तरीही काहीच हरकत नाही असे निवेदन कर्त्यांनी म्हटले असुन दक्षिणेकडे हि तोच निकष न.प.कर्मचाऱ्यांच्या अतिक्रमणांना बाबत लावण्यात यावा अशी मागणी केली आहे.

# तहसीलदारांनी वाळू माफियाची मस्ती जिरवली; ६ हायवासह ३ कोटी ५६लाखाचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

**२६ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ व अप्पर जिल्हाधिकारी रीता मेत्रेवार यांच्या मार्गदर्शनाने गोपनीय माहिती मिळाल्यावरून अंबड तहसीलदार श्री विजय चव्हाण यांना गोपनीय माहिती देऊन कारवाई करण्यासंदर्भात मौजे आपेगाव या परिसरात तहसीलदार विजय चव्हाण व त्यांची टीम यांनी अचानक खाजगी वाहनाने आपेगाव येथे गोदावरी पात्रात वाळू माफ यावर धाड टाकण्यात आली व जागेवरच त्यांची मस्ती जिरवली तसेच याप्रकरणी विना नंबरचे हवा दररोज छत्रपती संभाजी नगर व जालना अंबड मार्गावरील वाळू वाहतूक होती सदरील विना नंबरची हवा आरटीओ विभागाच्या अधिकाऱ्यांना दिसत नाही का असे पण बोलल्या जात आहे. आरटीओ विभागाने विना नंबरच्या वाळू वाहनावर कारवाई केल्यास वाळू माफिया वर धाक निर्माण होईल तसेच विना नंबरचे वाळू वाहन सुरू आहे ते आरटीओ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळेच सुरू असल्याचे बोलल्या जात आहे.**

दरम्यान आपेगाव येथील गोदावरी नदीपत्रात अवैध रेती वाहतूक करत असलेले सहा हायवा पकडण्यात आली हायवा पळून जाऊ नये म्हणून हायवाच्या चारही टायरचे वाल तोडून टाकण्यात आले जेणेकरून भरलेली हायवा चालवता येऊ नये व पळून जाऊ नये या हेतूने सर्वसाधारण पाठीमागील टायरचे चार वाल तोडून टाकण्यात आले. हे करत असताना अंधाराचा फायदा घेऊन काही वाहने पळून गेले असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या मदतीने रात्री तीन वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी यांनी पोलीस उपाधीक्षक यांना फोन करून तात्काळ पोलीस बंदोबस्त पाठवण्यात आला. त्यानंतर



महसूलच्या सर्व पथकास बोलावून घेण्यात आले व सकाळी सहा वाजता मौजे आपेगाव येथून जप्त करण्यात आलेले सहा हायवा प्रत्येक हायवा मध्ये एक महसूल कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांच्यासह तहसील कार्यालयात आणून लावण्यात आले. सदर वेळी सर्व वाहनांचे तपासणी करून पंचनामा करण्यात आला वाळू वाहनावरील ड्रायव्हर यांचा जबाब घेऊन त्यावर स्वाक्षरी व निशाणी अंगठा घेण्यात आले. मौजे आपेगाव येथे काही वाहने जागेवरच खाली करून गेले त्यामुळे सदर ठिकाणी जवळपास ६० ते ७० ब्रास रेती जप्त करण्यात आली आहे. सदरील जप्त करण्यात आलेली रेती घरकुल साठी किंवा शासकीय कामासाठी देण्यात येणार आहे. सदर कार्यवाही दरम्यान हायवासह तीन कोटी ५६ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला सदर वाहनावर जवळपास २२ लाख रुपये दंड आकारण्यात येणार आहे. अशी पण माहिती तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे. नदीकाठच्या काही गावांमधून सरपंच ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील हे सहभागी असल्या बाबतच्या तक्रारी प्राप्त झालेले आहेत त्यांची गोपनीय चौकशी करून तथ्य आढळून आल्यास सदरील सरपंच उपसरपंच सदस्य किंवा पोलीस पाटील यांचा सहभाग निश्चित झाल्यास त्यांच्यावर ती अपात्रतेची कारवाई करण्यात येणार आहे गोदावरी व इतर नद्या ज्या ठिकाणी वाळू उपसा होतो अशा ठिकाणी सीआरपीसी १४४ कलम लागू करण्यात आलेला आहे. अशा ठिकाणी हायवा किंवा रेती उत्खनन करणारे साहित्य उपलब्ध असल्यास, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तलाठी किंवा जबाबदार नागरिक या नात्याने नजीकच्या पोलीस ठाण्यामध्ये सदरची माहिती देऊन त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करू शकतात अथवा अवैद्य गौण खनिज उत्खनन अथवा चोरी होत असल्यास चोरीचा गुन्हा दाखल करू शकतात आजच्या कार्यवाहीमुळे सर्व अवैध रेती उत्खनन व वाहतूक करणाऱ्या रेती चोर व माफिया यांचे धाबे दणाणले आहे. यापुढेही अशा प्रकारे कार्यवाही करण्यात येणार आहे रेती माफियांकडून महसूल पथक नायब तहसीलदार अथवा तहसीलदार यांचे लोकेशन देत असल्याचे आढळून आल्यास त्यांच्याविरुद्ध सुद्धा कडक कार्यवाही करून गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे लोकेशन देणाऱ्यांनी सुद्धा याबाबतची खबरदारीची नोंद घ्यावी. सदरची कार्यवाही डॉ श्री कृष्ण पंचाळ जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी , अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार तहसीलदार विजय चव्हाण तलाठी बाळू सानप किरण जाधव श्याम विभुते व इतर महसूल सहाय्यक व ग्राम महसूल अधिकारी यांच्या समवेत करण्यात आली सदरील कारवाई दरम्यान पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता.

## पान १वरून...

### बिनविरोध निवडणुकीला

घेतला आहे. सध्या मतदान प्रक्रियेत सर्व उमेदवारांसोबतच मतदारांसमोर नोटा (वरील पैकी एकही उमेदवार नाही) असा पर्याय दिला जातो. त्यामुळे या पर्यायासाठी मतदान करण्याची कायदेशीर संधी मतदारांना नाकारली जाते, असा आक्षेप या संस्थेचा आहे. निवडणुकांमध्ये बिनविरोध उमेदवारांना निवडणूक न घेता विजयी घोषित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयानेही अप्रत्यक्षपणे आक्षेप घेतला आहे. बिनविरोध निवडणुकीसाठी किमान मतांची टक्केवारी अनिवार्य करण्याची तरतूद करावी, असा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिला असून पुढील चार आठवड्यांत आपली भूमिका मांडायला सांगितले आहे. एकच उमेदवार निवडणूक रिंगणात असेल तर त्याला किमान १० टक्के तरी मते मिळायला हवीत, अशी तरतूद करायला काय हरकत आहे? ५ टक्के मतेही मिळवू न शकणार्या उमेदवाराला संसदेत पोहोचण्याची परवानगी का दिली जावी? असे प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केले आहेत.

-----------

### पंजाबातील शेतकऱ्यांना ४८

गुरदासपूर, पठाणकोट हे जिल्हे पाकिस्तानच्या सीमेला लागून आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढल्यामुळे सीमेवरील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. शेतकऱ्यांनी कुंपणाजवळ लावलेली गव्हाची कापणी दोन दिवसांत पूर्ण करून शेत खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत मोठी कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शेतकऱ्यांनी वेळेत कापणी न केल्यास गेट पूर्णपणे बंद केले जातील, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ४८ तासांच्या आत आपली कापणी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. आदेशानंतर शेतकऱ्यांनी तातडीने कामाला सुरुवात केली आहे. ज्या शेतकऱ्यांची जमीन तारेच्या कुंपणाच्या पलीकडे आहे, त्यांच्याकडून तात्काळ पिकांची कापणी करण्यात येत आहे.

-----------

### जो राग भारतीयांच्या मनात

पाठवले आहेत. सर्वांनी या घृणास्पद दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांना शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत संपूर्ण जग १४० कोटी भारतीयांसोबत उभे आहे. मी पुन्हा एकदा पीडित कुटुंबांना आश्वासन देतो की त्यांना न्याय मिळेल आणि न्याय मिळेल, असेही शेवटी सांगितले.

------------

### देशाच्या एकतेच्या बाबतीत कोणतीही

असेल, पण जेव्हा देशावर हल्ला होतो तेव्हा मतभिन्नता नाही. आता भूमिका एकच देश एकत्र ठेवणं, त्यानंतर या गोष्टींचा विचार करतो. मागील काही दिवसांपासून आपण पहलगामचा विषय ऐकत आहोत. अतिरेक्यांनी हल्ले केले, निष्पा लोकांचे बळी घेतले. जे काही घडलं ती घटना देशाला धक्का होती. हा कुठल्याही जाती धर्माला धक्का नव्हता, हा भारताला धक्का होता. भारतवासियांवर हल्ला झाला. आता देशवासियांसाठी ही जबाबदारी असते की, राजकारणात मतभिन्नता नाही. केंद्रीय गृहमंत्र्यांनी समजंसपणाची भूमिका घेतली असल्याचे सांगत आमच्याकडून कुठेतरी कमतरता झाली आहे. पण त्या कमतरतेवर आज चर्चा नको अशी भूमिका मांडल्याबद्दल अमित शाह यांच्या भूमिकेचे कौतुकही केले. शरद पवार यांनी शेवटी बोलताना सांगितले की, ज्यांच्यावर हल्ले झाले त्यांच्या कुटुंबियांमध्ये विश्वासाचं वातावरण कसं निर्माण करता येईल हे आता पाहिलं पाहिजे असे यावेळी मत व्यक्त केले.

-----------

### मुस्लिमविरोधी वक्तव्यावर प्यारे खान

पर्यटकांचे संरक्षण करत आहेत. ते बंदूक पाठीवर घेऊन पर्यटकांना सुरक्षित स्थळी पोहोचवत आहेत. संकटसमयी जीव धोक्यात घालून मदत करणारे हेच मुस्लिम आहेत. त्यामुळे, अशा कठीण परिस्थितीत देखील मदतीचा हात देणाऱ्या समाजाविरोधात वक्तव्य करताना काळजी घ्यायला हवी.'' त्यांनी स्पष्टपणे सांगीतले की, महाराष्ट्र विधानसभेतील २८८ आमदारांपैकी नितेश राणे हेच एकमेव आमदार आहेत, जे देश तोडण्यासारखी भाषा करतात. ''दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी देश जोडण्याचे काम करत आहेत. देशाच्या अखंडतेसाठी प्रत्येक भारतीय एकजूट करण्याचा प्रयत्न करत आहे,'' असे प्यारे खान यांनी ठामपणे सांगितले. प्यारे खान यांनी पुढे बोलताना सांगितले की, ''देशातील मुस्लिम समाज देखील देशाच्या अखंडतेसाठी कटिबद्ध आहे. सध्याच्या काळात काश्मीरमधील मुस्लिमांनी पर्यटकांना जीव वाचवण्यासाठी मदत केली आहे आणि पाकिस्तानविरोधातही संताप व्यक्त केला आहे.'' त्यांनी स्पष्ट केले की, ''ही वेळ कोणत्याही धर्मावर टीका करण्याची किंवा राजकीय पोळी भाजण्याची नाही, तर संकटकाळात एकमेकांना आधार देण्याची आहे.'' राणेंच्या वादग्रस्त वक्तव्यावर टीका करताना प्यारे खान बोलले की, ''नितेश राणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विकास कामांवर लक्ष केंद्रित करावे. तेढ निर्माण करणाऱ्या विधानांपेक्षा विकासकामातून नेतृत्व सिद्ध करावे. जर हिंदूंचा नेता व्हायचे असेल, तर जनतेच्या भल्यासाठी काम करून दाखवा.''

राजकारणात टिकून राहण्यासाठी समाजात तेढ निर्माण करणे हा चुकीचा मार्ग आहे, असेही त्यांनी बजावले. विकासकामे, रोजगारनिर्मिती, शिक्षण व आरोग्य सेवा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे यालाच खरे नेतृत्व म्हणतात, असा सल्ला त्यांनी दिला. त्यांच्या या परखड आणि थेट विधानांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यामुळे नितेश राणे यांच्या भूमिकेवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

-----------

### पाकचे पाणी बंद केले नाही; सरकार

फक्त पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द करून त्यांना बाहेर काढता येत आहे, एवढीच वस्तूस्थिती असल्याचेही त्यांनी म्हटले. सिंधू जल कराराबाबत आंबेडकर म्हणाले, कोणताही करारनामा लगेच रद्द करता येत नाही, त्याच्यासाठी किंमत मोजावी लागते. पण मी म्हणतो करार रद्द केला तर केला रद्द. मात्र, त्याची फॉलोअप ॲक्शन घ्या ना. जे समोर आले त्यात धरणातील गाळ काढणार, पाणी अडवणार याला १० वर्षे लागतील, असेही त्यांनी म्हटले.

-----------

### शहरांचा चेहरा बदलल्यास ५० टक्के

महत्वाचा विषय असून महानगर एकीकृत वाहतूक प्राधिकरण तयार करण्यात येत आहे. प्रवासाच्या शेवटापर्यंत वाहतुकीची सुविधा मिळाल्याशिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर होत नाही. पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईमध्ये एकच तिकिटावर उपनगरी रेल्वे, मेट्रो, मोनो आणल्या असून वॉटर टॅक्सीदेखील त्यात उपलब्ध असतील. यात कोणत्याही व्यक्तीला प्रवासाच्या आराखडा ज्यात त्याच्या २०० मीटरवरून प्रवासाची साधने आणि गंतव्य स्थानापर्यंतचे प्रवासाचे पर्याय मिळतील. याची पहिल्या टप्प्यात पुढच्या ६ महिन्यात मुंबईत अंमलबजावणी होणार असून पुढे संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात होणार असल्याचेही यावेळी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, पुढील काळात मार्गांचे मॅपिंग करणार असून त्यासाठी गुगल सोबत करार करत आहोत. त्यातून सिग्नलचे सिमुलेशन करून वाहतूक व्यवस्थापन करण्यात येणार आहे. पुण्यात पीएमपीएमएल बस व्यवस्थेला मेट्रोचे जोड देऊन वाहतूक व्यवस्था बळकट करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रोला फिडर सेवा करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. पुण्यात त्यासाठी पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण (पुम्टा) तयार केले असल्याचेही यावेळी सांगितले. शासनाने गेल्या काळात पहिल्या टप्प्यात पूर्वी कधीच झाले नव्हते ते १७ क्षेत्रीय आराखडे केले. मुंबई, पुणे महानगरपालिका, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आदी क्षेत्रांचे विकास आराखडे केले. ते करताना विकास हा नजरेसमोर ठेवल्याने कोणतेही वाद निर्माण झाले नाहीत. आज नागरीकरणाच्या प्रक्रियेत आपण मोठ्या प्रमाणात नगरपालिका, नगरपंचायती तयार केल्या असून अशा ठिकाणी व्यवस्थित नियोजनाने गुंतवणूक करून वाढणाऱ्या हद्दीमध्ये नागरिकांसाठी सुगम जीवनशैली आणण्याची संधी आपल्यासमोर असल्याचेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशातील शहरे आज बकाल झालेली दिसतात. ग्रामीण भागातील नागरिक शिक्षण, आरोग्य, नोकरी, संधी, मनोरंजन आदी साठी शहरात येतात. अशा परिस्थितीत आपण गृहनिर्माण केले नाही तर झोपडपट्टी तयार होतात, नदी नाले बुजवून अतिक्रमणे होतात. शहरे वाढल्यामुळे घनकचरा, सांडपाणी, पिण्याच्या पाण्याची समस्या, निर्माण होते आणि शहरे व्यवस्थापनाच्या बाहेर गेलेली, शाश्वत आणि राहण्यायोग्य राहिली नाहीत हे अचानक लक्षात येत असल्याचेही यावेळी सांगितले.

------------

cmyk

# प्रवेश पूर्व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद पहिल्या टप्प्यात १०० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संकल्प विद्या मंदिर शाळेने सुरुवातीपासूनच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे उपक्रमशील शाळा म्हणून शाळेचे नाव लौकिक आहे.

त्यामुळे शाळेत प्रवेश घेण्याचा ओढा वाढलेला आहे म्हणूनच या प्रवेश पूर्व परीक्षेचे आयोजन केले होते यामध्ये विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. परीक्षेमध्ये पहिल्या टप्प्यामध्ये १०० विद्यार्थ्यांची प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात आली.

तसेच दुसऱ्या टप्प्यातील १०० विद्यार्थ्यांची लवकरच प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात येणार असून ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश पूर्व परीक्षा मध्ये उत्कृष्ट गुण घेतलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने फीस मध्ये सवलत ही देण्यात येणार आहे. या उपक्रमा विषयी पालकांनी समाधान व्यक्त केले. परीक्षा अगदी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाली.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५



# शेतकऱ्यांनो तुमच्या हिताचा फार्मर आयडी काढा

## सुटीच्या दिवशी रणरणत्या उन्हात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा दौरा

बीड । प्रतिनिधी

रविवार २७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीकृष्ण शिंदे यांच्यासह रखरखत्या उन्हात दौऱ्यावर निघाले . उद्देश एकच - शासनामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी फार्मर आयडी काढून देण्याची प्रक्रिया सुरू आहे , तथापि त्यास पाहिजे तसा प्रतिसाद जिल्ह्यातून नाही म्हणून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा यासाठी ही धावपळ . सर्वात आधी जिल्हाधिकाऱ्यांचा ताफा पोहोचला शहरातील आयटीआय कॉलेज परिसरात . तेथे प्रस्तावित इंक्युबेशन सेंटर म्हणजेच नवीन उद्योजकांसाठी प्रशिक्षण केंद्राची जागा पाहण्यासाठी . त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जेथे शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढून देण्याचे काम सुरू आहे , अशा एक-दोन ठिकाणी घेऊन चला अशा सूचना केल्या . त्यानुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वासनवाडी ग्रामपंचायत येथे ताफा वळविला . याठिकाणी वासनवाडी येथील सरपंच गणेश खोड , अशोक भाऊले , नंदकुमार खोड व गावातील नागरिक , मंडळ अधिकारी बाबासाहेब तांदळे , ग्राम महसूल अधिकारी शशांक कुलकर्णी , जगन्नाथ राऊत , शरद घोडके उपस्थित होते .

जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना फार्मर आयडी का काढावा याचे महत्त्व विशद करताना सांगितले की देशातील प्रत्येक नागरिकाचा वेगळा आधार आयडी आहे . त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचा एक ‘‘ युनिक फार्मर आयडी ‘‘ तयार केलं जाणार आहे . केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी ‘‘ॲग्रीस्टॅक‘‘ योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या यूनिक फार्मर आयडी आणि त्यांच्या जमीन रेकॉर्डला जोडण्याची ( लिंक करण्याची ) मोहीम सुरू आहे . सध्या त्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर राज्यात गाव पातळीवर विशेष कॅम्प आयोजित करून एक कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे युनिक फार्मर आयडी तयार केले जाणार आहेत . विशेष बाब म्हणजे भविष्यात शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ याच ‘‘ युनिक फार्मर आयडी ‘‘ च्या माध्यमातून मिळणार आहे . तसेच जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यासाठी ही भविष्यात हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे . त्यामुळे महसूल , कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांनी युनिक फार्मर आयडी तयार करून घेणे महत्वाचे ठरणार आहे .



‘‘ॲग्रीस्टॅक‘‘ योजनेअंतर्गत तयार होणारे ‘‘ युनिक फार्मर आयडी ‘‘ भविष्यात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे . पीएम किसान सन्मान योजनेचे अनुदान मिळविणे , किसान क्रेडिट कार्ड बनविणे , पीक विमा काढणे , त्या अंतर्गत परतावा मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल . शिवाय सरकारने जाहीर केलेली पिकांची नुकसान भरपाई मिळविणे , पीक व शेती विषयक सर्वेक्षण करून घेणे , शेतमालाची एमएसपीच्या दराने विक्री करणे , कृषी विभागाच्या विविध योजना अंतर्गत कृषी निविष्ठा व इतर सेवांचा लाभ मिळविणे , बाजारपेठेची माहिती , कृषी विषयक कामासंदर्भात कृषी तज्ञांचे मार्गदर्शन मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे . शेत जमिनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल .एवढंच नाही तर सरकारलाही या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून कोणत्या शेतकऱ्याची कुठे किती जमीन आहे . कोणता शेतकरी कोणकोणत्या योजनांचा लाभ घेत आहे हे सर्व एका क्लिकवर माहीत होणार आहे . या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून सरकारला चालू हंगामात राज्यातील किती शेतकऱ्यांनी कोणते पीक घेतले आहे , याची माहिती एका क्लिक वर मिळेल . यासाठी सर्व शेतकरी बंधू आणि भगिनींनी युनिक फार्मर आयडी काढून घ्यावा , असेही जिल्हाधिकारी यांनी आवाहन केले . यावेळी वासनवाडी येथील शेतकरी मदन घाटे यांना तात्काळ समोरासमोर फार्मर आयडी काढून दिला.

त्यानंतर प्रस्तावित विमानतळाची जागा बघण्याचा मानस जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला . त्यानुसार कामखेडा येथील सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीची व ३५० मीटर रुंदीच्या प्रस्तावित धावपट्टीची व परिसराची पाहणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली . यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीकृष्ण शिंदे , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी माहिती दिली . तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी अंगद काशीद यांनी नकाशा आधारे प्रस्तावित विमानतळाच्या हद्दी खुणा , कोणते गट समाविष्ट होतील यासंदर्भात सविस्तर माहिती सांगितली . यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कामखेडा येथील सी एस सी केंद्राला भेट दिली . यावेळी सरपंच बिलाल पटेल , सचिन जमदाडे , गजानन फाटे , सय्यद मोहम्मद सय्यद उस्मान , गणेश नेवडे , अरुण पवार , परमेश्वर पवार , रज्जाक शेख , प्रकाश वाघमारे , अब्दुल रहीम उस्मान शेख , सलीम शेख , मंडळ अधिकारी अंगद काशिद , अनिल तांदळे , ग्राम महसूल अधिकारी शरद घोडके , कृष्ण रत्नपारखे , गणेश गायकवाड , विकास ससाणे , आप्पासाहेब पवार उपस्थित होते . यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ॲग्रीस्टॅक प्रकल्पातर्गत फार्मर आयडी काढण्याचे काय महत्त्व आहे , याबद्दल सविस्तर माहिती दिली . तसेच सय्यद मोहम्मद सय्यद उस्मान या शेतकऱ्याचा फार्मर आयडी समोर काढून घेतला . गावकऱ्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला . रखरखत्या उन्हात , सुट्टीच्या दिवशी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाहणी दौरा केला . शेतकऱ्यांशी चर्चा केली , त्यांच्या समस्या जाणून घेतल्या . फार्मर आयडी काढण्यासाठी तळमळ व्यक्त केली . त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केल्या जात आहे. जिल्ह्यात सर्वत्र उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत तसेच गटविकास अधिकारी , ग्रामसेवक , तालुका कृषी अधिकारी , कृषी सहाय्यक यांच्यामार्फत फार्मर आयडी काढून देण्याचे काम वेगाने सुरू आहे . नागरिकांनी सुद्धा स्थानिक तलाठी , ग्रामसेवक , कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधून पुढील दोन दिवसात शंभर टक्के फार्मर आयडी ॲग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत काढून घ्यावेत , असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले .

# अंकुश नगर भागातील मुख्य रस्त्याची दुरावस्था, एक महिन्यापासून नळाला पाणी नाही

बीड । प्रतिनिधी

बीड येथील राजीव नगर कडून अंकुश नगर कडे जुना चराटा रोड या रस्त्याची दुरवस्था असून खड्ड्यामध्ये रोड की रोड मध्ये खड्डा आहे हा सर्वसामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे या रस्त्याचे आमदार साहेबांनी माननीय मंत्री महोदयांनी उद्घाटन करून देखील यहा रस्ता आजपर्यंत पूर्ण झालेला नाही या रस्त्यावरून राजू नगर अंकुश नगर कालिका नगर व पुढे पालवन चराटा कडे जाणाऱ्या नागरिकांचा मुख्य रस्ता आहे परंतु या रस्त्याची खूप बिकट अवस्था असताना कधी येथिल नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, व जिल्हा परिषदेने लक्ष दिले नाही म्हणून यांच्या



हलगर्जीपणामुळे येथील नागरिक मोठ्या संकटामध्ये आहेत या खराब रस्त्यामुळे अपघात होऊन जखमे होतात मणक्याचे आजार धुळीने एलर्जी वृद्ध माणसांना त्रास मोठ्या प्रमाणात येथील नागरिकांना सहन करावा लागत आहे या भागामध्ये समशान भूमी ते अंकुश नगर पाण्याची टाकी सिमेंट कॉंक्रेटचा रस्ता बनलेला असून त्यावरती पुलाचे काम अद्याप झालेले नाही म्हणून त्या रस्त्याचा नागरिकांना वापर करता येत नाही तो पूल देखील लवकर लवकर बनवण्यात यावे या भागातील नागरिकांना पाठीमागे एक महिन्यापासून एक हंडा पाणी घेण्यासाठी सर्वसामान्य माणसं दारोदारी भटकत आहेत त्यांना पाणी मिळालेले नाही त्या भागामध्ये सर्व गोरगरीब मजूर माणसं राहतात त्यांना पाणी विकत घेऊन जगणे हे होत नसल्यामुळे एका अंड्याच्या पाण्यासाठी दारोदारी भटकण्याची वेळ येत आहे या सर्व बाबींना घेऊन आम आदमी पार्टी येथील नागरिकांना सोबत घेऊन जिल्हा अधिकाऱ्यांच्या मार्फत निवेदन देणार आहे की या नागरिकांच्या प्रश्नावर गंभीरतानी विचार करून पूर्ण करण्यात यावेत जर हे पूर्ण झाले नाही तर लवकरच आम आदमी पार्टी येथील सर्व नागरिकांना सोबत घेऊन मोठे जन आंदोलन उभा करेल

# डॉ. पंकज आवटे, संभाजी मुंडे व सुशील गीते यांचे अभिनंदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा फक्त ऊसतोडणी मजुरांचा नसून आता भारतीय प्रशासनातही स्थान मिळवणारा म्हणून जिल्ह्याची ओळख पंकज आवटे संभाजी मुंडे व सुशील गीते यांनी निर्माण केली आहे. तिघांचेही अभिनंदन लोकनेते प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे. कायम दुष्काळग्रस्त असलेला हा जिल्हा या ना त्या कारणामुळे राज्यात गाजत असतो मध्यंतरी संतोष देशमुख हत्यानंतर जिल्हा राज्यात बदनाम झाला काही माणसे वाईट असू शकतात सगळा जिल्हा वाईट असू शकत नाही. जातीतील काही माणसे वाईट आहेत म्हणून सगळी जात बदनाम करण्याचे प्रयत्न मात्र आजही गुणवत्तेत जिल्ह्यातील पंकज ने सुशील ने आणि संभाजी मुंडे यांनी नावलौकिक मिळवला आहे जिल्ह्यातील या तरुणांनी बीड जिल्ह्याच्या यशात मानाचा तुरा रोला



आहे त्यांच्याकडून जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा आणि जिल्ह्याची शान वाढवावी असे आव्हान याप्रसंगी प्रा सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे. रात्रंदिवस अभ्यास करून या मुलांनी जे यश मिळवले आहे ते खरोखरच कौतुकास पात्र आहेत.



# जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा एनसीसी कॅडेट साहिल साबळे याची भारतीय सैन्यदलात निवड

गेवराई । प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची गेवराई येथील एनसीसी कॅडेट साहिल याची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे प्र मु अ पोपलघाट सर , एनसीसी विभाग प्रमुख लेफ्ट प्रवीण पंडित , तलाह कादरी सर , राऊत सर , गायकवाड सर , कुडके सर , गवळी सर,राठोड सर , विशाल काळे सर , झेंडेकर सर ,करवंदे सर पवार सर , पठाण सर , शिंदे सर , हिंगे सर श्रीमती बनसोडे मॅडम, पाठक मॅडम रसाळ मॅडम, होळकर मॅडम ,ससे मॅडम , आदींनी साहिलचा सत्कार करून शुभेच्छा देत अभिनंदन केले.

# शाश्वत जलस्त्रोत विकास उपक्रमांनी तिगाव जलयुक्त शिवार होणार; लोक सहभागातून जमला लाखोंचा निधी

वडवणी । प्रतिनिधी

प्राज फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने व गाव जलसमितीच्या लोकसहभागातून,विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी मार्फत राबवण्यात येणाऱ्या नदी खोलीकरण,रुंदीकरण,माती बंधारे,सिमेंट बंधारे खोलीकरणाचा उदघाटन समारंभ गावचे सरपंच, ऊपसरपंच, ग्रा प सदस्य सर्व गावकरी व शेतकर्यांच्या उपस्थीतीत पार पडला.पहिल्याच बैठकीत लोकसहभागातुन दोन लक्ष तिस हजार निधी जाहीर झाल्याने तिगाव शिवाराची पाणी पातळी वाढून जलयुक्त शिवार होणार आहे.

गावचे सुपुत्र लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड राज पाटील यांच्या संकल्पनेतुन तिगावची जलयुक्त शिवाराची वाटचाल चालु आहे.त्यासाठी श्री प्रकाश चोले सर प्रकल्प संचालक यांच्या विशेष प्रयत्नाने , प्राज फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने व विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी मार्फत प्रकल्प राबवण्यात येणार आहे. (प्राज फाउंडेशन मदत ७० टक्के आणि स्थानिक लोकसहभाग ३० टक्के) सहभाग राहिल.यामधुन नदी खोलीकरण करणे,रुंदीकरण करणे,सिमेंट बंधारे खोली करण करणे,डोह पद्धतीने पावसाचे पडणारे पाणी व वाहून जाणारे पाणी आडविने व जमिनी मध्ये जिरवणे आदी होणाऱ्या कामामुळे जमीनीत पाण्याचे भूजल पुनर्भरण होऊन जमीनीची पाणी पातळी वाढणार आहे. त्यामुळे गाव शिवारातील, पंचक्रोशितील





शेतकऱ्यांच्या शेतातील मुख्य जलस्त्रोत असलेल्या विहीर,बोअरवेल अदींना पाणी वाढणार आहे. शेतकर्यांचे उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. तिगाव ची कोरड्या दुष्काळा पासुन नक्कीच सुटका होऊ शकते. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात टँकरचा वापर केला जातो. तो या कामामुळे नक्कीच दुष्काळ निवारणासाठी फायदा होऊन टँकर मुक्त होऊ शकते.

या कार्यक्रमास मुख्यमंत्र्यांचे कार्यकारी अधिकारी श्री कैलास अंडील,यांच्या मातोश्री विमल परमेश्वर अंडील, ॲड राज पाटील अध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशन,सप्तशृंगी पतसंस्थेचे चेअरमन,डॉ प्रवीण सावंत,विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी चे प्रकल्प संचालक श्री प्रकाश चोले सर, समन्वयक ढाकणे सर,ग्राम विकास अधिकारी प्रमोद धुमाळ,सुरेश बादाडे,कुप्प्याचे सरपंच श्री सोनवणे,चिंचाळा सरपंच श्रीआजबे, संदीपान अप्पा खळगे, पत्रकार अशोक निपटे,मसुराम शेळके, यांच्या सह गावातील नागरिक, शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पान ६ वरून...

### भाजप पक्षाशी एकनिष्ठतेचे फळ

विविध प्रश्न मार्गी लावुन अनेक वंचितांना न्याय दिला होता.गेल्या लोकसभा निवडणुकीत अनेक कारणांमुळे राजकीय वातावरण दुषीत असताना देखील भाजपाचे देवळा गावचे बुथ एजंट म्हणून सुखदेव रेडे यांनी मोलाची कामगीरी केली.पंकजाताईशी एकनिष्ठ राहून भारतीय जनता पार्टीचे अगदी चोखपणे काम पार पडले.या सर्व गोष्टीची दखल घेत भाजपचे कार्यकारी अध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण,ना.पंकजाताई मुंडे(पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री) माजी खा.डॉ प्रितमताई मुंडे,जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सुखदेव रेडे यांची वडवणी भाजप तालुका अध्यक्ष म्हणून निवड केली आहे.येणा-या काळात तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत तालुका अध्यक्ष सुखदेव रेडे यांचा पक्षाला निश्चितच फायदा होईल.असे ही ते म्हणाले.याप्रसंगी बन्सीभाऊ मुंडे,संजय आंधळे,यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनराज मुंडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रणजीत धस यांनी मानले.

ना.पंकजाताईंनी दिलेल्या संधीचे सोनं करणार

राज्याच्या कॅबीनेट मंत्री व आमच्या नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांनी तालुका अध्यक्ष पदाची संधी मला दिली आहे.ही जबाबदारी जनतेच्या हितासाठी व पक्षाच्या वाढीसाठी तन मनाने स्विकारून पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी काम करणार.

-सुखदेव रेडे, नवनिर्वाचित भाजप तालुका अध्यक्ष वडवणी

### पेपरववाल्यांचे उपकार

अभियंता अभिजित शिंदे यांची वरीष्ठ आधिका-यांनी कानउघडणी करताच अभियंत्यांने स्वतः शेतकऱ्यांशी फोन वर संवाद साधत जळालेले केबल वायर बदलुन दिल्याने वीजपुरवठा सुरळीत झाला असुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असुन याबद्दल सरपंच विश्वंभर गिरी,भिमराव सुरवसे, युवराज सुरवसे यांनी डॉ . गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना पेपरवाल्यांचे उपकार झाले म्हणत कृतज्ञता व्यक्त केली .

३ दिवसांपूर्वी लिंबागणेश उपकेंद्रातील बोरखेड फिटरचे केबल जळाल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता.त्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. सरपंच विश्वंभर गिरी यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संपर्क साधत महावितरणचे अभियंता २ दिवसांपासून फोन उचलत नसल्याने आपण लक्ष देण्याची विनंती केली. डॉ.गणेश ढवळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांची व्यथा विविध दैनिकात प्रसिद्ध केली.दैनिकातील बातमींची महावितरणच्या वरीष्ठ आधिका-यांनी दखल घेत अभियंता शिंदे यांची कान उघडणी केल्यानंतर शिंदे यांनी सरपंच विश्वंभर गिरी व शेतकऱ्यांशी संवाद साधत आज दुपारी जळालेले केबल बदलून दिले.वीजपुरवठा सुरळीत झाल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असुन सरपंच विश्वंभर गिरी, शेतकरी अभिमान सुरवसे, युवराज सुरवसे यांनी प्रसारमाध्यमांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली.

### रक्तदान शिबिर आयोजनातील

डॉ अभिजीत सर्वज्ञ, मनोज काटे, ध्यानेश कुलकर्णी, स्वरदा ढोले, आनंद जोशी, नारायण शिरसाट,नवनाथ जोशी,पद्मनाभ औसेकर,सागर दीक्षित, गणेश देशमुख,श्रीराम रामदासी, बालाजी शिंदे, शंकर कदम, यांनी रक्तदान केले .रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विवेक बाबुळगावकर, केदार दामोशन, पार्थ कुलकर्णी, अविनाश लहुरीकर, गौरव कुलकर्णी, अक्षय देशमुख ,अनिता औटी, रेणुका भालेराव, स्मिता भातलवंडे , मोहिनी कळंबकर, मयुरी तोरंबेकर , साधना विर्धे यांच्यासह रक्तपेढीतील डॉ सबुरी शिंदे, सुवर्णा अरगडे, जगदीश रामदासी, मुस्कान, वाल्मीक कांबळे, आनंद सीताप,नितीन देवकर यांनी सहकार्य केले. शिबिराचे उद्घाटक यांनी केले रक्तदान... या रक्तदान शिबिराला प्रमुख अतिथी म्हणून डॉ अमित लोमटे यांना आमंत्रित केले होते. यावेळी डॉ अमित लोमटे यांनी रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले..

### भजन स्पर्धेस प्रतिसाद

योग आहे.उपस्थित पाहुण्यांचे स्वागत दासोपंत सत्संग मंडळाचे कार्याध्यक्ष राहूल देशपांडे,श्रेऊल गोस्वामी,सुमित केजकर,अवधुत कुंबेफळकर, माधुरी कऱ्हाडे आदींनी केले.प्रास्तविक गीताजंली कुलकर्णी यांनी केले संचालन नयना सेलुकर यांनी तर उपस्थितांचे आभार प्रणिता कुलकर्णी यांनी मानले. यावेळी स्पर्धक,रसिक,विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.२८ एप्रिल २०२५
४

# सोलारसाठी जास्तीचे पैसे मागितल्यास कंपनीवर कारवाई

पुणे : भरलेल्या रकमेतून सोलर पंप आस्थापित करण्यापासून त्याचे कार्यान्वयन, देखभाल दुरुस्ती आदींचा समावेश केलेला आहे. त्यामुळे कोटेशनच्या रकमेव्यतिरिक्त कोणतेही आगाऊ शुल्क घेतले जात नाही. शेतकऱ्यांनीही अशी आगाऊ रक्कम कोणाला देऊ नये, अथवा साहित्य आणून देऊ नये. त्यासाठी कोणी पैशांची मागणी करत असेल तर नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरणतर्फे 'मागेल त्याला सौर कृषीपंप योजना' सुरू आहे. तर यापूर्वी केंद्र सरकारच्या 'कुसुम-बी' योजनेतून सौर पंप आस्थापित केले आहेत. अनुसूचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांना ९५ टक्के तर इतर वर्गवारीतील शेतकऱ्यांना ९५ टक्के अनुदानातून सौर पंप मिळतात. त्यासाठी तीन अश्वशक्तीला (एचपी) अनुसूचित जाती व जमातीकरिता ११ हजार ४८६ रुपये, इतरांकरिता २२ हजार ९७१ रुपये, पाच अश्वशक्तिसाठी अनुक्रमे १६ हजार ३८ रुपये व ३२ हजार ७५ रुपये आणि ७.५ अश्वशक्तिसाठी २२ हजार ४६५ रुपये व ४४ हजार ९२९ रुपये भरावे लागतात.

मात्र या व्यतिरिक्त अधिकचे पैसे मागितले जात असतील तर त्याची तक्रार करता येते. या तक्रारींची महावितरणकडून चौकशी केली जाईल. तसेच सोलार कंपनीचा दोष आढळून आल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने कळविले आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९१६ : आयरिश भारतीय क्रांतिकारक डॉ. एनी बेसेन्ट यांनी ब्रिटीशकालीन भारतात होमरूल चळवळीची स्थापना केली.
१९२० : होमरुल लीगच्या अध्यक्षपदी महात्मा गांधी यांची निवड.
१९२० : अझरबैजानचा सो होम रुविएत युनियनमधे समावेश झाला.
१९३५ : रुसची राजधानी मास्को येथे भूमिगत रेल्वे 'मेट्रो' सुरू करण्यात आली.
१९६९ : चार्ल्स द गॉलने फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
२००१ : डेनिस टिटो हा पैसे देउन अंतराळात प्रवास करणारा पहिला अंतराळ प्रवासी झाला.
२००२ : राष्ट्रकुल(कॉमनवेल्थ) किंवा आयरिश नागरिकांद्वारे लिखित इंग्रजी भाषिक लिखित कादंबरी आणि युनाइटेड किंगडममध्ये प्रकाशित होणाऱ्या सर्वोत्कृष्ट मूळ कादंबरीसाठी दरवर्षी देण्यात येणारा 'मैन बुकर पुरस्कार' (साहित्यिक पुरस्कार) चे नाव बदलून ''मैन प्राइज फॉर फिक्शन'' असे करण्यात आले.
२००३ : ऍपल कम्प्यूटर इन्क. ने आयट्यून्स स्टोअर प्रकाशित केले.
२००८ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने 'पीएसएलव्ही-सी ९' या उपग्रहाचे प्रक्षेपण करून नवीन इतिहास रचला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५८ : जेम्स मोन्रो अमेरिकेचे ५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ४ जुलै १८३१)
१७९१ : शीख साम्राज्य शासक महाराजा रणजितसिंग यांच्या खालसा सेनेचे सेनापती हरीसिंह नलवा यांचा जन्मदिन.
१८५४ : वासुदेव गणेश तथा वासुकाका जोशी लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, चित्रशाळेचे विश्वस्त (मृत्यू: १२ जानेवारी १९४४)
१८५६ : वासुकाका जोशी या नावाने प्रसिद्ध असलेले भारतीय स्वातंत्र्य सेनानी, तसचं, लोकमान्य टिळक यांचे निकटवर्तीय व चित्रशाळेचे विश्वस्त वासुदेव गणेश जोशी यांचे निधन.
१९०८ : ऑस्ट्रियाचे व्यापारी व नाझीविरोधी ऑस्कार शिंडलर यांचा जन्म.
१९१६ : प्रसिद्ध लक्झरी स्पोर्ट्स कार लॅम्बोर्गिनी चे निर्माते फारूशियो लॅम्बोर्गिनी यांचा इटली येथे जन्म. (मृत्यू: २० फेब्रुवारी १९९३)
१९२९ : भारतीय चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध वेशभूषाकार भानू अथैया यांचा जन्मदिन.
१९३१ : मधु मंगेश कर्णिक, मराठी कथाकार, कादंबरीकार, कवी, संवादलेखक.
१९३७ : सद्दाम हुसेन इराकी हुकूमशहा व इराकचे ५ वे अध्यक्ष (मृत्यू: ३० डिसेंबर २००६)
१९४२ : माईक ब्रेअर्ली इंग्लिश क्रिकेटर
१९६८ : अँडी फ्लॉवर झिम्बाब्वेचा क्रिकेटपटू
१९७१ : एम्मे एंटरटेनमेंट या मोशन पिक्चर प्रॉडक्शन कंपनीचे सह-संस्थापक व सेव्ह द टाईगर या संस्थेचे सल्लागार निकील अडवाणी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२६ : थॉमस पिट, चेन्नईचा ब्रिटीश गव्हर्नर.
१७४० : थोरले बाजीराव पेशवे ऊर्फ श्रीमंत बाजीराव बल्लाळ बाळाजी भट यांचे नर्मदातीरी रावेरखेडी या ठिकाणी निधन झाले. (जन्म: १८ ऑगस्ट १७००)
१७४० : महाराजा छत्रसाल यांची कन्या आणि मराठा शासक पेशवा बाजीराव प्रथम यांची दुसऱ्या पत्नी मस्तानी यांचे निधन.
१९०३ : भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये आपले महत्वपूर्ण योगदान देणारे अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जोशिया विलार्ड गिब्स यांचे निधन.
१९४५ : इटलीचा हुकूमशहा बेनिटो मुसोलिनी याचा वध (जन्म: २९ जुलै १८८३)
१९७८ : अफगाणिस्तानचे पहिले अध्यक्ष मोहम्मद दाऊद खान यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १९०९)
१९९२ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ञ व इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक (जन्म: ९ ऑगस्ट १९०९)
१९९८ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (जन्म: २० जून १९३९)

# फुलकोबी मधील 'गड्डा सड रोग': कारणे आणि उपाय



फ्लॉवर पिकांमध्ये अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो, त्यापैकी गड्डा सड हा एक प्रमुख रोग आहे. हा रोग पानांवर आणि गड्ड्यांवर दिसून येतो आणि त्यामुळे पिकाचे मोठे नुकसान होते. फुलकोबी व्यतिरिक्त गड्डा सड रोग कोबी, चायना कोबी, ब्रोकोली, बृशेल, मोहरी या पिकांवर सुद्धा आढळतो.

रोगाची कारणे :हा रोग अल्टरनेरिया ब्रासिसिकोला नावाच्या बुरशीमुळे होतो. हा रोग बीजाणूंद्वारे बियाणे, जमीन आणि पिकांच्या अवशेषांमधून पसरतो. ८५ ते ९० टक्के आर्द्रता आणि २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान या रोगासाठी अनुकूल आहे. पाण्याचा ताण, अन्नद्रव्यांची कमतरता, किडींचा प्रादुर्भाव यामुळेही गड्डा सड रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.लक्षणे :रोगाच्या सुरुवातीला जुन्या पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसून येतात. हळूहळू हे ठिपके अर्धा इंचापर्यंत वाढू शकतात आणि एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. कालांतराने नवीन पानांवरही हे ठिपके दिसून येतात आणि पाने वाळून गळून पडतात. फुलकोबीच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसू लागतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो.

नुकसान :या रोगामुळे पिकाचे साधारणतः १० ते ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

एकात्मिक नियंत्रण उपाय :लागवडीसाठी प्रमाणित बियाण्यांचा वापर करावा. बियाण्यांना बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकाला योग्य प्रमाणात पाणी आणि अन्नद्रव्याचे व्यवस्थापन करावे. पिकांवर येणाऱ्या किडींचे वेळीच नियंत्रण करावे. जमिनीवर व झाडावर ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची फवारणी करावी. पुढील शिफारसीत बुरशीनाशकाची फवारणी करावी. क्लोरोथॅलोनील (७५ टक्के डब्ल्यूपी) किंवा मॅन्कोझेब (७५ टक्के डब्ल्यूजी) किंवा अॅझॉक्सिस्ट्रॉबीन (४.८ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू) अधिक क्लोरोथॅलोनील (४० टक्के डब्ल्यू/डब्ल्यू एससी) (संयुक्त बुरशीनाशक).

# उसाच्या पाचटाचे व्यवस्थापन

महाराष्ट्रात जवळजवळ १० लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड केली जाते व त्यापासून मोठ्या प्रमाणात उसाचे पाचट उपलब्ध होते. उसाच्या पाचटात ०.४ ते ०.५० टक्के नत्र, ०.१५ ते ०.२० टक्के स्फुरद आणि .९ ते १ टक्के पालाश तसेच ३२ ते ४० टक्के सेंद्रिय कर्ब असते. असे पाचट जाळल्यामुळे त्यातील सेंद्रिय कर्बाचा पुर्णतः नाश होतो. पाचटातील नत्र आणि स्फुरदाचा ९० टक्क्यांहून अधिक भाग जळून जातो, केवळ पालाश काही प्रमाणात शिल्लक राहते. परंतु अजूनही ऊस उत्पादक शेतकरी उसाचे पाचट मोठ्या प्रमाणात जाळून होणाऱ्या नुकसानीमध्ये भर घालत आहेत. महाराष्ट्रात जवळजवळ ४० ते ४५ टक्के क्षेत्रावर घेतल्या जाणाऱ्या खोडव्यापैकी पाचटाचा वापर मात्र १ टक्के क्षेत्रावरही होत नाही. हे थांबविण्यासाठी पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राने उसाच्या पाचटाचे व्यवस्थापन करण्याचे तंत्र विकसित केले आहे.

पाचटाची उपलब्धता :शेतातील ऊस तोडून गेल्यानंतर जी वाळलेली पाने शेतात पडतात, त्यास पाचट असे म्हणतात. पाचटामध्ये लिग्निन व मेणचट पदार्थाचे प्रमाण १५ टक्के असते. पाचटावर टोकदार केसासारखी कुसे असल्यामुळे जनावरे पाचट खात नाहीत. पाचटामध्ये ऊर्जा निर्मितीक्षमता कमी असते. शिवाय पाचट लवकर भरभर जळून राख होते. त्यामुळे पाचटाचा उपयोग जाळण्यासाठी करता येत नाही. सर्वसाधारणपणे एक हेक्टर शेतातून ७.५ ते १० टन पाचट उपलब्ध होते व त्यापासून ४ ते ५ टन सेंद्रिय खत मिळते. महाराष्ट्रात उसाखालील क्षेत्र १० लाख हेक्टर असून त्यापासून ७५ ते १०० लाख टन पाचट मिळू शकते.

पाचटाचे फायदे :वेगळे सेंद्रिय खत घालण्याची गरज नाही, कारण पाचटाद्वारे हेक्टरी ४ ते ५ टन सेंद्रिय खत मिळते. पाचट आच्छादन म्हणून काम करते, त्यामुळे पाण्याची बचत होते. पाचटामुळे तणाची वाढ होत नाही.

हिरवळीसाठी किंवा शेणखतासाठी लागणाऱ्या खर्चात बचत होते.पाचट जाळल्यामुळे होणारे तोटे :पाचट जाळल्यामुळे सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्यांचा नाश होतो. जमीन तापल्यामुळे नत्र व इतर अन्नघटकांचा थोड्याफार प्रमाणात वायुरुपात नाश होतो. जमीन भाजल्यामुळे पाचट जाळल्यामुळे १० टक्के नत्र व ७५ टक्के इतर अन्नघटक वाया जातात. पाचटावर असलेले मित्रकीटक यांचा सुध्दा नाश होतो.



# सेंद्रिय शेतीमध्ये निंबोळी पेंडीचे फायदे

सध्या हळू हळू सेंद्रिय शेतीचे महत्व वाढत चालले आहे. शेतातील वाढता रासायनिक खतांचा वापर यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येत असल्याने लोकांचा सेंद्रिय शेतीकडे कल वाढू लागला आहे. वाढत्या रासायनिक खतांच्या वापरामुळे लोकांना कॅन्सर सारख्या आजारांची आणि वेगवेगळ्या रोगांची लागण होत आहे. निंबोळी पेंड ही सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकरी वर्गाला खूप आवश्यक आणि फायद्याची ठरत आहे.

निंबोळी पेंडीचा शेणामध्ये वापर :सेंद्रिय शेती करण्यासाठी त्यात खत म्हणून नैसर्गिक वस्तूंचा वापर केला जातो. यामध्ये पालापाचोळा, शेण, वैरण, गांडूळखत आणि लिंबोळ्या पासून बनवलेले आणि कुजवलेले खत यांचा वापर केला जातो. लिंबाच्या झाडापासून मोठ्या प्रमाणात खत निर्मिती केली जाते. त्यास आपण ऑरगॅनिक खत असे सुद्धा म्हणतो. लिंबाचा पाळा आणि त्याच्या लिंबोळ्या या पासून निंबोळी पेंड तयार केली जाते. बाजारात याला मोठी मागणी सुद्धा आहे.निंबोळी खताचा वापर शेणामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. ऑरगॅनिक स्वरूपाचे खत असल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी या खताला आहे तसेच सेंद्रिय शेती साठी अत्यंत आवश्यक अशी ही निंबोळी पेंड आहे. निंबोळी पेंड ही फळबागायतदार कांदा उत्पादक शेतकरी आणि सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकरी वर्गाला खूप आवश्यक आहे.



सेंद्रिय शेतीमध्ये निंबोळी पेंड फायदेशीर :

सेंद्रिय शेतीमध्ये निसर्गतः उपलब्ध असणाऱ्या संसाधनांचा वापर करुन पिकांचे सरंक्षण आणि पीक पोषण केले जाते. वनस्पतीजन्य संसाधनमध्ये कडूनिंबाच्या झाडापासून मिळणाऱ्या पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर सेंद्रिय शेतीमध्ये होतो. यात ही कडूनिंबाच्या बियांपासून तयार होणारी निंबोळी पेंड मोठ्या प्रमाणात शेतीमध्ये वापरली जाते. मे-जून महिन्यात परिपक्व झालेल्या शुध्द निंबोळ्या गोळा करुन व्यवस्थित वाळविले जातात. त्यापासुन कोल्ड प्रेस्ड पध्दतीने निंबोळी पेंड तयार केली जाते. एक्पेलरमधून तेल न काढता तयार होणारी निंबोळी पेंड जास्त फ़ायदेशीर असते. यात निंबोळी मधील अॅझाडीरेक्टिन, निम्बीन, सलानिन हे घटक १०० ते १००० पिपिएमपर्यंत तसेच सिलिका १५ % सह इतर उपयोगी तत्व आलेले असतात. यात ५ ते ७ टक्के तेल असते. त्यामुळे कीटकनाशक गुणधर्मासह इतर अन्नद्रव्ये शेतात मिसळले जातात. यात नत्र ३ - ५%, स्फुरद १% पालाश १% या प्रमाणात असून पिकांच्या मुळांना हळुहळू उपलब्ध होतो. कडूनिंबातील विविध घटक जमिनीमध्ये गेल्यानंतर मुळांद्वारे शोषले जातात. या पद्धतीमुळे जमीनीतील वावरणाऱ्या किडींचे तसेच पिकांवरील रसशोषक किडींचे देखील नियंत्रण होते. जमिनीमध्ये वास्तव्य करणाऱ्या हानिकारक किडी जसे मुळे कुरतडणाऱ्या अळ्या, हुमणी यांचा बंदोबस्त चांगल्या प्रकारे होतो. तसेच भाजीपाला पिकांवर डाळींब पिकाच्या मुळांवर गाठी करणाऱ्या हानिकारक सुत्रकृमींचादेखील बंदोबस्त चांगल्या प्रकारे होतो. पिकांमध्ये निंबोळी पेंड वापरल्यानंतर ३ ते ६ आठवड्यात त्याचे फ़ायदे दिसू लागतात. निंबोळी पेंडमधील घटक जमिनीत हळूहळू काम करत असल्यामुळे सहा महिन्यांपर्यंत याचा परिणाम दिसून येतो.

निंबोळी पेंडचा शेतात वापर : निंबोळी पेंड शेणखत तसेच इतर सेंद्रिय खतांसोबत वापरण्यास अतिशय सुलभ आहे. रासायनिक खतांच्या बेसल डोसमध्ये देखील वापरता येते. निंबोळी पेंड मुळांच्या कार्यक्षेत्रात व्यवस्थित पोहचेल अशा पध्दतीने टाकावी. फ़ळझाडांमध्ये मुळांच्या जवळ ड्रिपरजवळ खड्डा घेउन त्यात निंबोळी पेंड टाकून मातीने बुजवुन घ्यावी. शेत तयार करताना देखील निंबोळी पेंडचा वापर करता येईल किंवा उभ्या पिकात निंबोळी पेंड फ़ोकुन, हाताने पसरवुन देता येते. भाजीपाला पिकामध्ये बेडमध्ये बेसल डोस टाकताना निंबोली पेंडचा वापर करता येतो. जैविक कीडनाशके-जैविक खते निंबोळी पेंडसोबत सुलभरित्या वापरता येतात. ट्रायकोडर्मा, सुडोमोनास, बॅसिलस, बिव्हेरिया, मेटारायझियम, पॅसिलोमायसिस, अॅझोटबॅक्टर, पिएसबी, केएमबी सारख्या उपयुक्त सुक्ष्मजिवांचा वापर निंबोळी पेंडीला चोळून किंवा सोबत मिक्स करुन करता येतो. प्रमाण : फ़ळझाड : १ किलो पासुन ५ किलो प्रति झाड प्रति हंगाम भाजीपाला पिके : बेसल डोसमध्ये ५०० ते १००० किलो प्रति एकरी केळी : २५० ग्राम प्रति झाड २ महिन्यांच्या अंतराने ऊस लागवडीच्या वळेस ५०० किलो ३ महिन्यांनतर ५०० ते १००० किलो

निंबोळी पेंडीचे फायदे : शेतात निंबोळी पेंड घातल्यामुळे रानातील जमिनीतील वाळवी, हुमणी आणि ढेकूण या सारख्या किड्यांपासून शेतातील पिकांचे संरक्षण होते. वेगवेगळ्या प्रकारच्या बुरशी पासून पिकांचे संरक्षण होते. आणि पिके रोगराई ला बळी पडत नाहीत. शेतात निंबोळी पेंड घातल्यामुळे पिक वाढीस फायदा होतो त्याचबरोबर पिकाला अनेक वर्षे पर्यंत अन्नपुरवठा करत राहतात त्यामुळे इतर खतापेक्षा निंबोळी पेंड फायदेशीर ठरते. उपयुक्त असणाऱ्या जमिनीतील सूक्ष्म जिवाच्या वाढीसाठी उपयुक्त असते. त्यामुळे शेतात निंबोळी पेंड घालावी. शेतात सेंद्रिय कार्बन चे प्रमाण वाढण्यास मदत होते. शेतातील उत्पन्न वाढण्यास मदत होते. आणि शेतातील मातीची सुपीकता वाढते. निंबोळी खताच्या वापरामुळे पीक उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते.

# रुग्णांचे आई-वडिल होऊन सेवा करा- डॉ. आदिती सारडा

## आदित्य नर्सिंग महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ उत्साहात

बीड । प्रतिनिधी

आई-वडील जसे आपल्या लेकरावर जीव लावतात तसाच जीव आपण रुग्णसेवा करताना आपल्याकडे आलेल्या रुग्णा प्रति दाखवावा. जेणेकरून रुग्णाची केलेली सेवा हीच ईश्वराची सेवा ठरेल. आदित्य नर्सिंग महाविद्यालयामधील पहिली विद्यार्थ्यांची बॅच बाहेर पडताना एका डोळ्यामध्ये अश्रू तर दुसऱ्या डोळ्यांमध्ये आनंद आहे. उद्या माझे विद्यार्थी रुग्ण सेवेचे दायित्व यशस्वीपणे पार पाडतील यामध्ये कोणतीही शंका नाही. असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य नर्सिंग महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संचालिका डॉ. आदिती सारडा या बोलत होत्या.



कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांची होती. व्यासपीठावर डॉ. आदिती सारडा, प्राचार्य प्रा. विकास गर्जे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात आहेत. देशासह परदेशातही मोठ-मोठ्या पदावर आज आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यरत आहेत. याचा अभिमान वाटतो. आज तुम्ही नर्सिंगचे शिक्षण पूर्ण करून रुग्ण सेवेचे दायित्व यशस्वीपणे पार पाडा. तुमच्या यशावरच आदित्य शिक्षण संस्थेचे नाव देशासह परदेशात अभिमानाने घेतले जात असल्याचे डॉ. आदिती सारडा यावेळी म्हणाल्या. यावेळी पठाण अक्यूब ह्या विद्यार्थ्याने आपला महाविद्यालयातील प्रवास सांगितला. कशाप्रकारे महाविद्यालय व संस्था नेहमी त्याच्या पाठीशी उभी होती हे त्याने आपल्या शब्दातून सांगितले. हा कार्यक्रम संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, आदित्य नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य विकास गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. प्रा. धीरज कुमार बारगजे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी मुलांना भविष्यात कशाप्रकारे तुम्ही आधी परिचारिका म्हणून काम करू शकता व रुग्णसेवा पुरवू शकता याबद्दल मार्गदर्शन केले.र्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती मस्के यांनी तर आभार प्रा. गाडे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. रागिनी देवकर, प्रा. प्रा. सय्यद महरीन, प्रा. शेख महेर यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदित्य नर्सिंग कॉलेजचे पाचव्या सत्रातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

### आयुष्यभराची शिदोरी मिळाली

अपूर्वा शेंदुते या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सर्व प्राध्यापक वर्ग विद्यार्थ्यांच्या यशासाठी मेहनत करतात. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. आम्हाला येथे पुस्तकी ज्ञानाबरोबर आयुष्यभराची शिदोरी मिळाली आहे. येथील प्राध्यापकांच्या मोलाचा मार्गदर्शनामुळे यश पचवायचे आणि येणाऱ्या संकटाला सामोरे जाण्याची एक हिम्मत सोबत मिळाली असल्याचे अपूर्वा शेंदुते ही विद्यार्थीनी म्हणाली.

# बीए चव्हाण यांना आदर्श ग्रामविकास अधिकारी म्हणून सन्मानित



चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा ग्रामपंचायत मधील ग्रामपंचायत अधिकारी श्री चव्हाण बी ए यांना जिल्हा परिषद बीड यांच्याकडून आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून पुरस्कार देऊन दिनांक २४ ४ २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री आदित्य जीवने साहेब अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. साळुंखे साहेब प्रकल्प संचालक अधिकारी श्रीमती पाटील मॅडम वित्त अधिकारी श्री केंद्रे साहेब पाणीपुरवठा स्वच्छता उपमुख्य अधिकारी मोराळे साहेब व इतर जिल्हा परिषद बीड यांच्या सर्व खाते प्रमुख उपस्थितीत आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले चव्हाण बीए गावात सन २०१६ पासून ते आजगायात काम करत आहेत चौसाळाच्या मोठ्या लोकसंख्येच्या गावात आर आर पाटील स्मार्ट ग्रामपंचायत म्हणून तालुक्यात प्रथम क्रमांकाने बक्षीस मिळवून दिलेले आहे.

शासनाच्या विविध विकास योजना हे चांगल्या पद्धतीने व वेळेत सर्वसामान्य माणसापर्यंत राबवितात गावात शासनाचे विविध प्रकल्पाचे उपक्रम तसेच वृक्ष लागवड स्वच्छता बचत गटाची स्थापना कर वसुली घरकुल योजना यासारख्या कामात नियमित अग्रसेर असतात चौसाळा या मोठ्या लोकसंख्येच्या तसेच जिल्हा परिषद गावचे गाव म्हणून असून या ग्रामपंचायत कार्यालय नव्हते आमदार फंडातून झालेले लहान खोलीचे ग्रामपंचायत कार्यालय चलायचे परंतु चौसाळा गावात जुनी ग्रामपंचायत ची मोगलकालीन इमारत एक आरोग्य केंद्राची इमारत या ठिकाणी होती आल्यासारखी मोठी इमारत बांधकाम तसेच गावातील व्यापारी वर्गासाठी व्यापारी गाळे दोन मजली एकूण १५ बांधकाम गाळे केल्या व जाहीर लीला आधारे बोले लावून आलेल्या रकमेतून भव्य इमारत सर्व सोयीने युक्त उभारली आज तेथे कार्यालय चालू आहेत.

तेथे ग्रामपंचायत तसेच ग्रामपंचायत कामे कर व पाणीपट्टी वसुली करण्यासाठी माननीय जिल्हा न्यायालयाकडून दर तीन महिन्यांनी लोक आदलत होत असते यामध्ये सुद्धा सतत व नियमित चांगले कामे केल्यामुळे माननीय जिल्हा विधि प्राधिकरणचे सचिव साहेब यांनी सुद्धा चांगले कामाबद्दल प्रशस्तिपत्र पत्र देऊन गौरव करण्यात आला होता सदर या मिळालेला पुरस्कार बद्दल जी प. सदस्य अशोक लोढा चौसाळ्यातील सरपंच बाबु शेठ लोढा उपसरपंच अंकुश कळासे सामाजिक कार्यकर्ते नितीन शेठ लोढा सतीश जोगदंड मोहन झोडगे चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे व ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक पत्रकार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे

# दिवाळीपर्यंत जालन्यात एक दिवसाआड पाणीपुरवठा-आ. खोतकर



जालना । प्रतिनिधी

२६ एप्रिल रोजी आ. खोतकर यांनी अंबड येथील नवीन उभारण्यात येणार्या जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी पत्रकारांसोबत केली. येत्या दिवाळीपर्यंत म्हणजेच नोव्हेंबर- डिसेंबर २०२५ महिन्यापर्यंत जालन्यात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येईल, असा वायदा केला आहे. अंबड येथे जलशुध्दीकरण केंद्रावर आ. खोतकर यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले की, जालनेकरांना एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यासाठी अंबड येथे जलशुध्दीकरणाचे काम सुरू आहे. सुमारे ३५ दक्षलक्ष लिटरचा हा जलशुध्दीकरण केंद्र आहे. आपण निवडून आल्यानंतर पहिल्याच महिन्यात या कामास सुरूवात केली. आज सदरील काम प्रगतीपथावर आहे. येत्या दिवाळीपर्यंत सदरील काम पुर्ण होईल. व त्यानंतर जालेनकरांना एक दिवसाआड मुबलक पाणीपुरवठा होईल असा वायदा त्यांनी केला.


यावेळी बोलतांना आ. खोतकर यांनी जालना शहर महापालिकेचे प्रशासक व आयुक्त संतोष खांडेकर यांनीही जलशुध्दीकरण व इतर पाण्याच्या कामासाठी नियमीतपणे सातत्य ठेवले. व लवकरात लवकर सदरील जलकुंभाचे काम पुर्ण होईल, असा आशवाद त्यांनी व्यक्त केला. जे मी, बोलतो, ते करून दाखवितो असे म्हणत अंबड येथे जलकुंभ केंद्र परिसरात संरक्षण भिंत बांधली आहे. शहरातील नवीन जालना भागात काही ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकण्यात आली. या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री आजितदादा पवार यांनी भरभरून साथ दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानले. जालनेकरांच्या प्रत्येकाच्या घरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. आता जालन्याचे नांव पाण्यामुळे बदनाम होणार नाही, असेही आ. खोतकर यांनी यावेळी म्हटले. यावेळी पंडीतराव भुतेकर, आयुक्त संतोष खांडेकर, महानगरपालिका चे केशव कानपुडे ,अभियंता राजेश बगळे यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# भावाच्या शब्दांनी मिळाली उभारी; बहिण झाली एमपीएससी अधिकारी!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिट्ठी सारख्या छोट्याशा गावातील कोमल आप्पाराव भोंडवेची गोष्ट कोणालाही प्रेरणा देऊ शकते! ''अंगाला हळद लावण्यापेक्षा कर्तृत्वाचा गुलाल लावलेला चांगला!'' ह्या तिच्या भावाच्या शब्दांनी तिला एक नवा दृष्टिकोन दिला, आणि त्या शब्दांमुळेच तिनं एमपीएससीच्या कठीण परीक्षेत यश संपादन केलं. गावातील एका साध्या कुटुंबात वाढलेली कोमल, घराच्या सर्व जबाबदाऱ्या पार करत, एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत होती - ''अधिकारी बनायचं!'' आणि तिच्या मनात ठरलेलं तिने साध्यही केलं.

तिच्या भावाने नेहमी तिला सांगितलं, ''मुलीचं कर्तृत्व तिच्या अंगाला लावलेल्या हळदीपेक्षा मोठं असायला हवं. आयुष्याला जिंकायचं असेल, तर कर्तृत्वाची फुलं उगवली पाहिजेत!'' त्याच्या शब्दांनीच तिला पुढे जाऊन संघर्ष करण्याची आणि योग्य पद्धतीने जीवनाला आकार देण्याची प्रेरणा मिळाली.कोमलचं यश फक्त तिच्या कुटुंबाचं नाही, तर संपूर्ण गावाचं आहे. तिच्या यशाचा उत्सव गावात मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला. जीप मिरवणूक, टाळ्यांचा गजर, आणि गावकऱ्यांचा अभिमान या सगळ्याचं एकच कारण होतं, कोमलचं अथक



परिश्रम आणि त्यावर मिळालेलं यश.कोमल म्हणते, ''स्वप्नं पाहणं, त्यांचं ध्येय ठरवणं आणि त्यासाठी मेहनत करणं, हेच यशाचं गमक आहे. आणि भावाच्या शब्दांनी मला नेहमीच हे शिकवलं की, 'यश मिळवण्यासाठी मेहनत हीच खरी हळद आहे आणि कर्तृत्वाचा गुलाल चांगला!'''कोमलच्या यशाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे संघर्ष, धैर्य आणि कष्ट हेच यशाचे खरे शस्त्र आहेत.''आज कोमलच्या यशाने साऱ्यांना हे सांगितलं की, संघर्षाचा मार्ग लांब असला तरी, कर्तृत्वाच्या मदतीने प्रत्येक युवक, प्रत्येक मुलगी, स्वप्नं पूर्ण करू शकते!''

# संत चोखामेळा यांची बीडमध्ये पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी होणार

बीड । प्रतिनिधी

संत चोखामेळा यांची पुण्यतिथी बीड शहरात यावर्षी पहिल्यांदा साजरी केली जाणार आहे. वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने एक दिवसीय पुण्यतिथी उत्सवाचे आयोजन केल्याचे वारकरी साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्री ह भ प रामेश्वर महाराज धपाटे यांनी सांगितले. आज या पुण्यतिथी उत्सवाच्या नियोजनासाठी बीड येथील शासकीय विश्रामगृहात व्यापक बैठक संपन्न झाली..१७ मे रोजी पुण्यतिथी उत्सव आहे.. त्या निमित्त या बैठकीला जिल्हाभरातील वारकरी साहित्य परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते..

वारकरी संप्रदायाच्या संत मालिकेतील ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा काय भुललासी वरलिया अंगा.. अशी परखडपणे अभंगाच्या माध्यमातून चपलाख देणाऱ्या संत चोखामेळा



यांची पुण्यतिथी बीडमध्ये नव्याने साजरी केली जाणार आहे.. उपेक्षित असलेल्या संतांचे विचार जनसामान्यापर्यंत जावेत व त्यांचे कार्यही लोकांना समजावे या दृष्टिकोनातून साहित्य परिषदेने या अनोख्या उपक्रमाचे आयोजन केले आहे. बीड शहरात हा एकदिवसीय पुण्यतिथी उत्सव साजरा होणार आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील ११०१ जनाई मुक्ताई हरिपाठ मंडळाच्या महिलांना साडी चोळीचे वाटप केले जाणार आहे. विशेष या कार्यक्रमासाठी आचार्य अमृताश्रमजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून कीर्तन भजनाच्या माध्यमातून हा अनोखा उपक्रम साजरा केला जाणार आहे. प्रामुख्याने चोखामेळा यांचे जीवन चरित्र याचा जागर केला जाणार आहे. वारकरी साहित्य परिषदेचे जिल्हाप्रमुख रामेश्वर महाराज धपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक संपन्न झाली. यावेळी प्रमुख उपस्थिती महिला जिल्हाध्यक्ष सुरेखाताई पितळे, जिल्हा कार्याध्यक्ष, चंद्रकांत महाराज नेहकर, अकरा तालुक्याचे तालुकाप्रमुख उपस्थित होते.




माजलगाव:- येथे भारतीय जनता पार्टीच्या माजलगाव शहर, किट्टी आडगाव व पात्रुड मंडल अध्यक्षपदी विनायक रत्नपारखी,सौ रूपालीताई कचरे डॉ.अभिजीत सोळंके यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित श्री सिद्धेश्वर संकुलाचे कार्यवाह विश्वास जोशी, प्रशांत भानप, निरंजन वाघमारे, रामभाऊ जाधव, अविनाश कांदुरे,पवन मोगरेकर,हरिभाऊ नवले,प्रल्हाद दळवी,डॉ.गणेश पाटील,शरदराव कचरे,कैलास जोशी,रामेश्वर चव्हाण,नामदेव मुळे,सुभाष कांबळे,अनिल गोंडे,गोपाळ कुलकर्णी,सौ.प्रिती पाटील यांची उपस्थिती होती.

# स्वामी समर्थ पुण्यतिथी नाम जप यज्ञ सप्ताह मोठ्या उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नाम जप यज्ञ सप्ताह येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सात दिवसांत श्री गुरुचरित्र पारायण, अखंड प्रहरे, मंडल मांडणी, यज्ञ भुमी मध्ये नित्य स्वाहाकार, गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी समर्थ याग, रुद्र मल्हारी याग, गीताई याग तसेच दहि भात लेपन, श्री नवनाथ भक्तिसार पारायण, सुलभ भागवत पारायण, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र पारायण, हवन युक्त श्री गुरुचरित्र पारायण, दररोज श्री स्वामी चरित्र सारामृत पारायण, श्री दुर्गा सप्तशती पाठ, श्री मल्हारी सप्तशती पाठ, त्याच बरोबर बालसंस्कार वर्ग घेण्यात आले.





सायंकाळी नैवेद्य आरतीनंतर गीतेचा पंधराव्या अध्यायाचे वाचन, श्री विष्णू सहस्त्रनाम, मनाचे श्लोक, पसायदान, संत तुकाराम महाराजांचा अभंग इत्यादी सर्व सेवा घेण्यात आल्या. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी दिवशी सकाळी श्री सत्यदत्त पूजन, बलीपुर्णाहुती इत्यादी अध्यात्मिक उपक्रम परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने व आदेशानुसार घेण्यात आला. सकाळी ठिक साडे दहा वाजता नैवेद्य महाआरती करण्यात आली. यावेळी माजलगाव शहरासह तालुक्यातील विविध भागातून भाविक महिला पुरुष, सेवेकरी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. यानंतर सर्वांना सप्ताहाचा मांदियाळी महाप्रसाद वाटप करण्यात आला. हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवार यांनी प्रयत्न केले.

# विमल थेटे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील शिंदे नगर फेज वन मधील रहिवासी आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी विमलबाई अच्युतराव थेटे यांचे तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने शनिवारी दुपारी १ च्या सुमारास दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७७ वर्षे होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. बीड शहरातील बायपास लागत असलेल्या शिंदे नगर फेज १ मधील रहिवासी विमलबाई अच्युतराव थेटे यांचे शनिवार दिनांक २६ /४ /२०२५ रोजी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने दुपारी१ च्या सुमारास निधन झाले. त्यांच्यावर रात्री



नऊ वाजण्याच्या सुमारास बीड शहरातील मोंढा भागातील अमरधाम स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी थेटे परिवाराचे नातेवाईक, मित्रपरिवार, शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विमलबाई थेटे या वनविभागातील सेवानिवृत्त कर्मचारी सुनील थेटे व संभाजीनगर शहरातील नेत्रदीप ऑप्टिकलचे संचालक अनिल थेटे यांच्या आई होत्या. तर बीड शहरातील प्रसिद्ध व्यापारी बाळासाहेब थिगळे यांच्या सासू होत्या. त्यांच्या पाश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे

# समावेशन तत्काळ करा नसता सामुहीक आत्मदहन करणार

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी नगरपंचायत कार्यालय अंतर्गत समावेशन करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला होता परंतु जाणून-बुजून प्रस्ताव मध्ये काही किरकोळ त्रुटी असल्यामुळे प्रस्तावा परत पाठवण्यात आला होता. सदरील प्रस्ताव परत दुरुस्ती करून आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासनसंचालनालय सि.बी.डी. नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला होता. परंतु काही अधिकारी कर्मचारी जाणून-बुजून प्रस्ता मंजूर करण्यासाठी टाळाटाळ करीत आहे करता आत्मदहन करण्यासाठी २५ एप्रिल रोजी स्ममरण पत्र देण्यात आले आहे. नवनिर्मित तीर्थपुरी नगरपंचायत मधील कार्यरत ग्रामपंचायतकालीनकर्मचारी समावेशन संदर्भातील आत्मदहना करणार असल्याचे निवेदना मार्फत करण्यात येत आहे . या प्रकरणी सविस्तर माहिती अशी की १७/०४/२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय,छत्रपतीसंभाजीनगर नगरपालीका प्रशासन विभाग व संचालनालय मुंबई यांच्या वर पाठविलेले निवेदन.

आ.हिकमतदादा उढाण सदस्य विधानसभा घनसावंगी मतदारसंघ यांचे पत्र पण देण्यात आले. तीर्थपुरी नगरपंचायत येथे कार्यरतग्रा.प.कालीन कर्मचारी समावेशन करणे करिता प्रस्ताव यापुर्वी दिनाक ०५/०६/२०२३ रोजीआपले कार्यालयात सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाने वेळोवेळी त्रुटी पूर्तता करण्या बाबत कळविले असता, त्या बाबतची त्रुटीपुर्तता वेळोवेळी सदर कार्यालयात करण्यात आलेली आहे.मा.जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने दि.२९/०५/२०२४ रोजी मा.विभागीय आयुक्त ,छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे त्रुटी पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव मुळ कागदपत्रासह सादर करण्यात आलेला आहे. तसेच मा.आयुक्त तथासंचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय सि.बी.डी.नवी मुंबई यांनी ०३ मार्च २०२५ रोजी आपल्या कार्यालयास तीर्थपुरी नगरपंचायत मधील कार्यरतग्रामपंचायतकालीन कर्मचारी यांचे नवनिर्मित नगरपंचायत मध्ये समावेशनकरण्यासंदर्भात मार्गदर्शनपर परिपत्रक निर्गमित केलेले आहे. त्या अनुषंगाने १७/०४/२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संभाजीनगर व संचालनालय मुंबई यांच्या मेल वर अधिकृत रित्या समावेशनासंदर्भात होत नसल्यामुळे सामुहिक आत्मदहन बाबत कळविण्यात आले आहे. व छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय येथे आवक-जावक विभागात दिनांक. २३/०४/२०२५ रोजी सदर निवेदनाची देण्यात आली आहे. यासंदर्भात अद्याप ही सदर निवेदना बाबत आपल्या कार्यालया कडुन कोणतीही कार्यवाही झालेलीनाही.म्हणून ३०/०४/२०२५ पर्यंत आमचे समावेशन न झाल्यास दिनांक ०१/०५/२०२५ रोजी कामगारदिनी रोजीआम्ही कर्मचारी नगर पंचायत कार्यालय तीर्थपुरी येथे सामुहीक आत्मदहन करणार असुन, सदर आत्मदहनास वरील वरिष्ठ कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहील. याची गांभीर्यपुर्वक नोंद घेण्यात यावे असे निवेदना मार्फत करण्यात आले आहे.दत्ता काशीनाथ वाघ, संतोष नारायण लवनाडे,गणेश श्रीमंत मोरे, आकाश गणेशराव नारळे, किशोर हरिभाऊ जाधव, जितेंद्रकुमार माणिकराव गाढेकर, सोपान तुळशीराम कडुकर, सुरेश रामदास मस्कावदे, ज्ञानेश्वर अच्युत बोबडे , प्रभाकर विश्वनाथ पाटील राजेंद्र विष्णु कडुकर, रामेश्वर लक्ष्मण कासार,विकास वसंत साबळे, यांच्या निवेदनावरील स्वाक्षऱ्या आहे

# बीड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा जीपीएफ सुरू करा




माजलगांव । प्रतिनिधी

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा जीपीएफ तात्काळ सुरू करावा अशी मागणी राज्य अंशतः अनुदान प्राप्त २००५ पूर्वी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचेकडे निवेदनाव्दारे दि. २४ एप्रिल गुरूवार रोजी करण्यात आली आहे.

शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने शिक्षण उपसंचालकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर शंभर टक्के आलेल्या कर्मचा-यांची नियमीत जीपीएफ कपात सुरू आहे तर काही कर्मचाऱ्यांची जीपीएफ कपात बंद आहे.त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे बीड जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक व संबंधित वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयास आदेशित करावे अशी मागणी करण्यात आली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश गवते,प्रा. पठाण,प्रा.जाधव, प्रा.जयप्रकाश मलवाडे यांची उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५


# वीरशैव बांधवांच्या श्रमदानातून सकलेश्वर (बाराखांबी)मंदीर परीसरात स्वच्छता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहरापासून अवघ्या एक ते दिड किलोमीटर अंतरावर असलेल्या यादव कालीन व अध्यात्मिक महत्व असलेल्या पुरातन सकलेश्वर (बाराखांबी)महादेव मंदिर परिसरात श्रमदानातून सुशोभिकरण आणि र्जिणोध्दार करण्याचे काम वीरशैव बांधवांनी हाती घेतले असून प्रत्येक रविवारी सकाळी श्रमदानातून परिसराची स्वच्छता केली जात आहे.येत्या पावसाळ्यात या परिसरात जवळ पास एक हजार वृक्षांचे रोपण करून त्यांचे संगोपन करणार असल्याचा संकल्प विरशैव बांधवांनी केला आहे.**

स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना - सकलेश्वर(बाराखांबी) मंदीर

अंबाजोगाई मधील मंदिर स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासात सकलेश्वर महादेव मंदिरास महत्त्वपूर्ण स्थान द्यावे लागेल या संदर्भातील शिलालेख हा शके ११५० मधील असून तो यादव नृपती सिंघनदेव यांच्या राजवटीतील आहे या लेखात असे म्हटले आहे की,सेनापती खोलेश्वर यांनी हे देऊळ रचले (बांधले) याविषयीचे जे भूर्जपत्र देण्यात आले ते जशास तसे या शिलालेखावर कोरून ठेवले आहे असे वर्णन अनेक ऐतिहासिक,अध्यात्मिक ग्रंथांत आहे.

सेनापती खोलेश्वर यांनी सकलेश्वर मंदिरासाठी जमिनी दान दिल्याचा उल्लेख देखील आहे गावापासून वायव्येस सुमारे दोन किलो मीटर अंतरावर हे मंदिर असून मंदिराची रचना करताना पातळ लिंगी गर्भगृह त्यापुढे अंतराळ त्यापुढे बारा स्तंभावर



आधारित चौरसाकृती सभामंडप उभारला आहे तो सर्व बाजूंनी खुला असून मधोमध वर्तुळाकृती आखला आहे त्याच्या सभोवताली आठ स्तंभावर करोटक पद्धतीचे उंच वितान उभारलेले दिसतात बाकी भागावर क्षित उक्षिप्त पद्धतीचे वितान आहेत.

येथील स्तंभ वैशिष्ट्यपूर्ण तर आहेतच शिवाय त्यावर अलंकारांनी विभूषित नृत्यमग्न स्थितीतील अप्सरांची सुरेख शिल्पे आहेत दीप धारण केलेल्या सप्तमातृका देखील भिंतीवर कोरलेल्या आहेत.

मंदिर सध्या उध्वस्त अवस्थेत असले तरी बारा खांबावर उभारलेले हे मंदिर बाराखांबी या नावाने ओळखले जाते बारा स्तंभावरील कोरीव काम यादवकालीन शिल्पकलेचे उत्कृष्ट सर्वोत्तम उदाहरणच म्हणायला हवे. मध्ययुगीन कालखंडातील मंदिर स्थापत्यकलेच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण असणारे हे सकलेश्वर कलात्मक मंदिर सिंघनदेव यांचा सेनापती खोलेश्वर याने शके अकराशे पन्नास मध्ये उभारल्याचे मंदीरातील

शिलालेखातून स्पष्ट होते

आपल्या वैशिष्ट्यांनी नटलेले अप्रतिम शिवमंदिर कर्नाटकातील ऐहोळे मंदिराच्या स्थापत्यकलेशी सार्धम्यता दाखवणारे असून मुळात हे शिवालय अवकाशातून शिवपिंडीच्या आकाराचे दिसते आज विदीर्ण अवस्थेत असलेले हे मंदिर यादवकाळात अप्रतिम मंदिर होते.अशाच सांस्कृतिक स्त्रोतांमुळे देशाची वैभवशाली दैदीप्यमान संस्कृती अवघ्या विश्वाला आकर्षित करते मंदिरात जवळ असलेला एकूण ४७ओळीचा शिलालेख देवनागरी लिपीतील असून आरंभीच्या पस्तीस ओळी संस्कृतच्या तर उर्वरित ओळी अर्धवट मराठी, अर्धवट संस्कृत देवनागरी लिपीतील आहेत मंदिराच्या काही अंतरावर पापनाशी नावाचे पुरातन तीर्थ असून सकलेश्वर हे शहरातील श्रध्देसाठीचे हे एकमेव शिवालय आहे.

# श्री.संकटमोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या भव्य शिखरावर कळशारोहनानिमित्त शिवमहापुराण कथा सप्ताह

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील,ग्रामदैवत श्री.संकटमोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच जीर्णोद्धार ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून करण्यात आला आहे या मंदिरावरील कळशारोहनानिमित्त भव्य शिवमहापुराण कथा व अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन शनिवार दि.१९ एप्रिल २०२५ ते २६ एप्रिल २०२५ शनिवार यादरम्यान मंदिराच्या प्रारंगणात करण्यात आले होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, श्री.संकट मोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच जीर्णोद्धार करण्यात आलेला आहे मंदिरावरील कळशारोहना निमित्त



भव्य शिव महापुराण कथा व अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

पहाडी पारगाव येथील दत्त मंदिर संस्थानचे ह.भ.प.श्री.गुरुवर्य अरविंद बाबा गिरी महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून शिवमहापुराण कथा संपन्न झाली.डॉ.अक्षय मुंडे शिवमहापुराण कथे दरम्यान आले असता त्यांची आयपीएस पदी निवड झाल्याबद्दल अरविंद बाबानी त्यांना आशीर्वाद दिला.चैत्र कृ.११ दि.२४ एप्रिल २०२५ गुरुवार रोजी सकाळी ८:०० वाजता कळशाची भव्य मिरवणूक गावामधून काढण्यात आली. गुरुवर्य ह.भ.प.वसंत महाराज पिंपळनेरकर, ह.भ.प.शांतिब्रह्म श्री.नवनाथ महाराज, ह.भ.प.श्री.अर्जुन महाराज लाड,ह.भ.प. शांतिब्रह्म श्री.पांडुरंग महाराज मुंडे,ह.भ.प.श्री.नवनाथ महाराज फुटाणे,ह.भ.प.श्री.भगवान महाराज वरपगावकर, ह.भ.प. आचार्य श्री. विठ्ठल महाराज शास्त्री,रामायणाचार्य ह.भ.प.श्री. बाबा महाराज चारदरीकर यांच्या उपस्थितीत त्यांच्या आशीर्वादाने मंदिरावरील कळशारोहन कार्यक्रम संपन्न झाला. मंदिराच्या शिखरावरील पंचधातूच्या कळशाचा संपूर्ण खर्च गावच्या लेकीने केला त्यांना मंदिर जीर्णोद्धार समितीने पितळाच्या धातूची पंचआरती भेट दिली.

शिवमहापुराण कथा व अखंड नामजप सप्ताहाची सांगता ह.भ.प.श्री.महंत आप्पासाहेब महाराज चौरे यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने झाली.

भक्तिमय वातावरणामध्ये कळशारोहनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविक भक्त व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जेबापिंप्री येथे वीज पडून म्हैस ठार




**चौसाळा । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या जेबापिंप्री येथे शनिवार (दि. २६) रोजी दुपारी तीन च्या दरम्यान ढगाळ वातावरण झाले होते. अचानक वादळ वारा सुटला आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. जेबापिंप्री येथील शेतकरी शहाजी नवनाथ कागदे यांच्या गट नंबर १७३ मध्ये गोठ्याजवळ बांधलेली मुरा जातीची म्हैस ही वीज पडून ठार झाली. सदरील घटना समजल्यानंतर शेतकरी यांनी संबंधित तलाठी मंडळ अधिकारी व पशुवैद्यकीय अधिकारी यांना दूरध्वनी द्वारे सदरेल घटनेची माहिती दिली असून सदरील घटना घडल्यामुळे शेतकरी शहाजी नवनाथ कागदे यांच्यावर संकट ओढावले आहे.

महसूल विभागाचे मंडळ अधिकारी तसेच तसेच तलाठी. अनकर मॅडम यांनी सदरील घटनेचा पंचनामा केला असल्याचे कळते.तसेच या दुर्घटनेचे पशुवैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन केले आहे जेणेकरून शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळण्यास मदत होईल.

# भजन स्पर्धेस प्रतिसाद ब्राम्हण ऐक्य परिषदेचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ब्राम्हण ऐक्य परिषदेच्या वतीने रविवारी भजन स्पर्धा संपन्न झाल्या. या प्रसंगी

व्यासपीठावर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनिता मोदी,जया मुडेगांवकर, डॉ.संध्या काळेगांवकर, दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की,बालरोग तज्ञ डॉ.सुधीर धर्मपात्रे,डॉ.प्रसाद कुलकर्णी, देवघरचे अध्यक्ष लक्ष्मीकांत गोस्वामी,पंचमवेद अकादमीचे अध्यक्ष विनोद निकम आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना



पत्की म्हणाले की,अध्यात्म व प्रबोधन हा समाज परिवर्तनाचा गाभा आहे. हा गाभा ईश्वरी नामसंकिर्तनातून तयार होतो त्या नामसंकिर्तनासाठी भजनच आवश्यक असून अशा स्पर्धांच्या माध्यमातून प्रबोधन सहज शक्य होतअसल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी बोलताना सुनिता मोदी म्हणाल्या की,नामस्मरण केल्याने मनाला मोठी शांतता मिळते आणि बक्षीसापेक्षा ते महत्वाचे आहे. निकम म्हणाले की,नामस्मरणातून मिळालेले समाधान हे आयुष्यभर कायम राहील संतांच्या नामाचे स्मरण हा स्पर्धक आणि श्रोत्यांसाठी अविस्मरणीय ◀◀ पान ३ वर

# रक्तदान शिबिर आयोजनातील पेशवा प्रतिष्ठानचे सातत्य कौतुकास्पद -डॉ.नितीन चाटे

## पेशवा प्रतिष्ठान तर्फे आयोजित रक्तदान शिबिरात ४२ जणांचे रक्तदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त २००९ पासून दरवर्षी रक्तदान शिबिराची आयोजन पेशवा प्रतिष्ठान तर्फे करण्यात येते. रक्तदान शिबिराचे आयोजन हे एक विधायक कार्य असून पेशवा प्रतिष्ठान यांनी राखलेले सातत्य कौतुकास्पद असल्याचे मत डॉ.नितीन चाटे यांनी व्यक्त केले. भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्धाटन प्रसंगी डॉ. चाटे बोलत होते. यावेळी डॉ अमित लोमटे, डॉ चेतन आदमाने, डॉ सुधीर धर्मपात्रे, डॉ ओंकार ताथोडे, डॉ कौस्तु कुलकर्णी उपस्थित होते. डॉ.अमित लोमटे म्हणाले की, समाजातील गरजूंना मदत करणे हे सर्वात



मोठे सामाजिक कार्य असून अनेकदा रक्ताचा तुटवडा असतो ,त्यामुळे काही रुग्णांना जीव गमावण्याची वेळ येते परंतु समाजातील सामाजिक संघटना रक्तदान शिबिराचे आयोजन करून एक चांगले कार्य करत आहेत. या शिबिरास माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, गणेश मसाने , पद्माकर सेलमोकर, संजय देशपांडे , महेश राडकर, आनंद टाकळकर सह अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. या शिबिरात डॉ. महेश अकोलकर, पार्थ कुलकर्णी, केदार दामोशन, डॉ संकेत तोरंबेकर , डॉ.मिलिंद कळंब, आश्लेषा कळंबकर ,शिरीष हिरळकर, श्रीकांत जोशी, राहुल कुलकर्णी, रेवती कुलकर्णी, स्वप्ना देशपांडे, प्रमोद नांदगावकर, कविता कुलकर्णी, सचिन भातलवंडे, विशाल जहागीरदार, सुजित विडेकर ,केदार वारकरी, शैलेश दीक्षित, सारंग इवरकर, वैशाली देवगावकर, प्रज्ञा देवगावकर, कृष्णा कुलकर्णी, शिवम वाळके, वामन मुळी, प्रदीप रेनापुरकर, किशोर जोशी , सुजत दीक्षित, वामन खोत, वल्लभ पिंगळे, ◀◀ पान ३ वर

# भाजपा जिल्हाध्यक्ष आष्टीचे असताना आष्टी-पाटोदा-शिरूरच्या निवडी का नाहीत

## जिल्ह्यातील राजकीय वर्तूळात चर्चा

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाच्या विविध तालुक्यांतील अध्यक्षपदाच्या निवडी जवळपास पूर्णत्वास आल्या असताना, आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्याच्या अध्यक्षपदाची निवड अद्यापही रखडलेली आहे. यामुळे जिल्हा राजकारणात उलटसुलट चर्चा सुरू असून, कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.विशेष म्हणजे,भाजपचे जिल्हाध्यक्ष सध्या आष्टी तालुक्यातील असूनही, आपल्या तालुक्यातील अध्यक्षपदाची निवड न होणे हा चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे. इतर तालुक्यांमध्ये नियुक्त्या सुरळीत पार पडल्याने, आष्टी-पाटोदा-शिरूर विभागातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.पक्षांतर्गत गटबाजी, स्थानिक मतभेद किंवा वरिष्ठ नेत्यांकडून अद्याप मान्यता न मिळाल्यामुळे ही नियुक्ती लांबणीवर पडली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच, काही इच्छुक नावांची जिल्हा स्तरावरुन पाठवलेली शिफारस अद्याप पक्षाच्या उच्च नेतृत्वाकडून मंजूर न झाल्याचे समजते.

या संदर्भात एका ज्येष्ठ पदाधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, ''या तालुक्यांत योग्य समन्वय साधणे गरजेचे आहे. कुणाचाही गट नाराज न होता सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा स्वीकार होईल, अशी नियुक्ती करण्यात येणार आहे.''पण काहींना वाटते की, जिल्हाध्यक्ष आष्टीचे असूनही त्यांच्या स्वतःच्या तालुक्याची अध्यक्ष निवड न होणे हे त्यांच्या कार्यशैलीबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.आता या नियुक्त्या कधी आणि कशा पद्धतीने होतात याकडे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# पेपरवाल्यांचे उपकार : मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला

## प्रसारमाध्यमांच्या दणक्याने महावितरण ताळ्यावर, एका दिवसात वीजपुरवठा सुरळीत केला- डॉ.ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश उपकेंद्रातील बोरखेड फिटरचे केबल ३ दिवसांपूर्वी जळाल्याने महाजनवाडी येथील शेतकऱ्यांच्या जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता.काल शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी संपर्क साधुन अडचण सांगितल्यानंतर याविषयी डॉ.गणेश ढवळे यांनी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध केल्या.याची दखल घेऊन २ दिवसांपासून शेतकऱ्यांचा फोन न उचलणारे महावितरणचे ◀◀ पान ३ वर



# भाजप पक्षाशी एकनिष्ठतेचे फळ सुखदेव रेडे यांना मिळाले -माजी आ.आंधळे



## ना.पंकजाताईंनी दिलेल्या संधीचे सोनं करणार - सुखदेव रेडे

वडवणी प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून कुठल्याही प्रकारची अशा न बाळगता भारतीय जनता पक्षाशी आणि ना.पंकजाताई मुंडे यांच्या घराण्याशी एकनिष्ठ राहून तसेच राजकारणाची सुरुवात ही भाजप या पक्षात झाली.भाजपाचे अहोरात्र काम करत राहिल्याने व सुखदेव रेडे यांना त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष मिळाले.असे मत चौसाळा विधान सभा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांनी व्यक्त केले.

आज दि.२७ एप्रिल रोजी समाधान निवासस्थानी नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष सुखदेव रेडे यांचा तालुक्यातील भाजपच्या वतीने ठेवण्यात आलेल्या भव्य सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते.यावेळी वडवणी नगर पंचायतचे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे माजी तालुकाध्यक्ष विश्वनाथ झाटे,संजय आंधळे,अंकुश वारे,अनिल छोले,शिवाजी देवकते,महादेव सावंत,रणजीत धस,धनराज मुंडे,भागवत शिंदे,अभिमान कदम,विठ्ठल शिंदे,नारायण सोळंके,दत्ता रेडे,पपेश पवार,अविनाश लवटे,सुशील कदम,धनंजय आंधळे,यासह डोंगरपट्ट्यातील व तालुक्यातील भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलतांना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की,ना.पंकजाताई मुंडे यांनी सुखदेव रेडे यांना २०१६ साली देवळा पंचायत समितीची उमेदवारी देऊन निवडून आणुन पंचायत समिती सदस्य केले होते.त्याकाळात देखील त्यांनी पं.स.गणातील ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# भारती ने कौशल्य विकास शिक्षणाचे विद्यापीठ सुरु करावे- मंत्री मंगलप्रभात लोढा

**पुणे । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय हे खऱ्या अर्थाने डायमंड युनिव्हर्सिटी आहे. काळाची गरज ओळखून भारती विद्यापीठाने कौशल्य विकास शिक्षणाचे सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे. कौशल्य विकास शिक्षणाचे विद्यापीठ सुरू करण्यासाठी प्रस्ताव पाठवा, त्यास कोणतीही दिरंगाई न करता तीन महिन्यांत संमती देऊ, अशी ग्वाही कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.



भारती विद्यापीठातर्फे देण्यात येणारा जीवनसाधना गौरव पुरस्कार डॉ. तारा भवाळकर यांना विद्यापीठाच्या ३०वा स्थापना दिन कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह, प्र-कुलगुरू, आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कुलसचिव जी. जयकुमार, विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान विभागाच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, कार्याध्यक्ष आनंदराव पाटील, सहकार्यवाह व. भा. म्हेत्रे, डॉ. एम. एस. सगरे, डॉ. के. डी. जाधव आदी उपस्थित होते. अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. मिलिंद जोशी यांचा सत्कार डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते करण्यात आला.

हसन मुश्रीफ म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीच्या मूल्यांकनाकरीता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धेत भारती विद्यापीठाला प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता सर्वांनी मिळून प्रयत्न करावे. डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही नवनवीन आव्हाने पेलायची आहेत. शिक्षणाचा उपयोग व्यवहारात करता यावा यासाठी कौशल्य विकासावर भर देण्याचा प्रयत्न विद्यापीठाद्वारे केला जात आहे. मान्यवरांचे स्वागत डॉ. विश्वजीत कदम यांनी केले. प्रास्ताविक डॉ. विवेक सावजी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र उत्तुरकर, डॉ. ज्योती मंडलिक यांनी केले.

# पानटपरी चालकावर जीवघेणा हल्ला, तिघांकडून लोखंडी गजाने मारहाण

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून, खून, मारामाऱ्या यासारख्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथे हप्ता न दिल्याने पानटपरी चालकावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पानाचे पैसे मागितल्याच्या कारणावरून माजी उपसरपंच रेश्मा कुसेकर यांचे पती नितीन उर्फ अण्णा कुसेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पानटपरी चालकाला लोखंडी गजाने मारहाण केली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, किशन शिवाजी नप्ते (वय ४४, रा. नप्तेवस्ती, करंदी) हे आपल्या 'शिवदरबार पान शॉप'मध्ये काम करत होते. यावेळी नितीन कुसेकर, सचिन कुसेकर, रवींद्र उर्फ पांडा जगताप आणि एक अनोळखी तरुण कारमधून येऊन त्यांनी चार पान घेतली. यानंतर नप्ते याने पैसे मागितल्यावर गावात आमची दहशत आहे, तु पण दोन हजार रुपये हप्ता दे अशी धमकी देत, दुकानदाराला ओढून लोखंडी गजाने बेदम मारहाण केली.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या किसन नप्ते यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी नितीन कुसेकर, सचिन कुसेकर, रवींद्र जगताप आणि अनोळखी तरुण यांच्या विरोधात खुनाचा प्रयत्न आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे करीत आहेत.

# भोर शहरात सकल हिंदू समाजाचा मोर्चा



**भोर । प्रतिनिधी**

पहेलगाम येथे अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबाराच्या हल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने भोर शहरातून मोर्चा काढण्यात आला. शनिवारी (ता. २६) सायंकाळी दीड तासांच्या कालावधीत काढण्यात आलेल्या या मोर्चात शहरासह तालुक्यातील महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

शनिवारी सायंकाळी सात वाजता एसटी स्टँडपासून मोर्चास सुरुवात झाली. मंगळवार पेठ, नगरपालिका चौक, शिवाजी रस्ता या मार्गावरून चौपाटी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ मोर्चाचा समारोप झाला. मोर्चात पाकिस्तानच्या आणि अतिरेक्यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी माजी नगरसेवक यशवंत डाळ, सोमनाथ ढवळे, प्रमोद कुलकर्णी, सचिन मांडके, सचिन कन्हेरकर, सारंग शेटे, महेश शेटे, अमर ओसवाल, महेंद्र ओसवाल, बाळासाहेब खुटवड, स्वाती गांधी, दीपाली शेटे, पल्लवी फडणीस, अशोक तुपे, तुषार साळेकर आदी प्रमुख मान्यवरांसह सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक आदी उपस्थित होते. चौपाटी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ काही मान्यवरांनी भाषण करून अतिरेक्यांविरोधात लढण्यासाठी भोरवासीयांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले

# नसरापूरमध्ये वसुंधरा दिनानिमित्त 'शिवगंगा नदी स्वच्छता मोहिमे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

भोर । प्रतिनिधी

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधत नसरापूर गावातील विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, स्वयंसेवक आणि ग्रामस्थ यांनी शिवगंगा नदीच्या स्वच्छतेसाठी एकत्र येत एक भव्य स्वच्छता मोहीम राबवली. पर्यावरण रक्षणाचा संदेश देताना शेकडो विद्यार्थ्यांनी नदीपात्रातील घाण, प्लास्टिक कचरा आणि इतर प्रदूषण हटवून परिसर पुन्हा स्वच्छ आणि सुंदर बनवला.



या उपक्रमात प्राथमिक व माध्यमिक शाळांचे विद्यार्थी, स्थानिक ग्रामपंचायत सदस्य, स्वयंसेवी संस्था तसेच विविध सामाजिक गट सहभागी झाले होते. दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या या मोहिमेत सर्वांनी कचरा उचलणे, वेगवेगळ्या प्रकारचा कचरा वर्गीकरण करणे आणि योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे यावर भर दिला.

शाळांतील मुख्याध्यापक रेवती पवार, विक्रम कदम, राहुल शेटे, संगीत घाडगे, वैशाली भारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून घेतले. तसेच ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, तलाठी, आरोग्य अधिकारी, विविध सामाजिक कार्यकर्ते यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.हातमोजे आणि मास्क घालून विद्यार्थ्यांनी नदीतील कचरा हटवताना स्वच्छतेचे भान पाळले. या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीची बीजे पेरली गेली. स्वच्छता हीच सेवा या तत्त्वावर चालत प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून काम केले. ही मोहीम केवळ एकदाच न थांबवता, परिसरातील प्रत्येक व्यक्तीने आपापल्या पातळीवर स्वच्छतेसाठी प्रयत्न करावेत असा संदेश देण्यात आला. पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. नसरापूरच्या विद्यार्थ्यांनी वसुंधरा दिनाचे औचित्य साधत 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीने समाजासमोर ठेवला. ही फक्त एक दिवसाची मोहीम नसून पुढील काळातही अशीच जागृती ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ज्याप्रमाणे एका थेंबाने सागर तयार होतो, त्याचप्रमाणे एकेक नदी स्वच्छ करत आपण पुन्हा निसर्गाचे गोडवे गाणारे बनू शकतो.नसरापूरकरांनी दाखवलेली ही एकजूट आणि निसर्गप्रेम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरतेय! या मोहिमेसाठी सरपंच उषा कदम, उपसरपंच नामदेव चव्हाण, ग्रामसेवक विजय कुलकर्णी, आरोग्य सेविका लीलावती शिवाजी निकम यांनी मार्गदर्शन केले. ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. प्लास्टिकमुक्त नदीसाठी भविष्यात दर महिन्याला असे उपक्रम राबवण्याचा निर्धार करण्यात आला.

# ट्रक, मोटारीची समोरासमोर टक्कर; महिलेचा मृत्यू, तर तिघे जखमी

ओतूर – ओतूर (ता.जुन्नर) येथे अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर अहिनवेवाडी फाट्याजवळ आयशर ट्रक आणि मोटारीची सामोरासमोर धडक झाली. या अपघात एक महिला ठार तर तीन जण जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी (ता. २६) दुपारी चार वाजता घडली.



अपघातात सीताबाई अंबू साबळे (वय ८० निमगिरी (तळेरान) ता.जुन्नर) यांचा जागीच मृत्यू झाला असून, स्वप्नील निवृत्ती शेळके, दीपाली स्वप्नील शेळके (रा.करंजाळे ता.जुन्नर) यासह एक महिलाही जखमी झाली आहे.

अपघाताबाबत मिळालेली माहिती अशी की, अहिल्यानगर कल्याण राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी दुपारी आयशर ट्रक ओतूरकडून कल्याणच्या दिशेने चालला होता. त्याच वेळी मोटार मढ बाजूकडून ओतूरच्या दिशेने येत होती.

या दोन्ही वाहनांचा ओतूर गावच्या हद्दीत अहिनवेवाडी फाट्याजवळ समोरासमोर टक्कर होऊन अपघात झाला. या अपघात मोटारीमधील साबळे या जागीच ठार झाल्या, तर इतर दोन महिला व एक पुरुष गंभीर जखमी झाले. जखमींना आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

या अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस सहायक पोलिस निरीक्षक एल.जी.थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी एस.एस.भोते व इतर कर्मचाऱ्यांच्या पथकाने अपघातस्थळी जाऊन दोन्ही वाहने महामार्गावरून बाजूला करून जखमींना उपचारासाठी पाठवून वाहतूक सुरळीत केली.

# खेड, शिरूर, आंबेगावातील ३६ गावे दुष्काळमुक्त करणार; जयप्रकाश गोरे यांची ग्वाही

वाफगाव: पुणे जिल्ह्यातील धरणाचे पाणी इतर जिल्ह्यांना दिले जाते. परंतु जिल्ह्यातीलच खेड, आंबेगाव व शिरूर तालुक्यांतील ३६ गावे दुष्काळग्रस्त आहेत. या गावांना धरणाचे पाणी मिळाले पाहिजे. या गावांचा दुष्काळ हटवण्यासाठी लवकरच मंत्रालयात बैठक घेऊ. मुख्यमंत्र्यांना भेटून हा भाग दुष्काळ मुक्त करू, अशी ग्वाही ग्रामविकासमंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी दिली.



कनेरसर (ता.खेड) येथे गुरुवारी (दि. २४) झालेल्या ३६ गावच्या पाणी परिषदेत ते बोलत होते. दुष्काळी भागातून आलो असल्याने दुष्काळी परिस्थितीची जाण आहे. त्यामुळे या गावांचा शेती व पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करण्याच्या सूचना या वेळी गोरे यांनी अधिकार्यांना दिल्या. या परिसरात पाणी फिरण्यासाठी चासकमान, कळमोडी व डिंभे धरणातील मूळ फेरवाटपाला धक्का न लावता या धरणाच्या पाण्याचे फेरवाटप करण्याची आग्रही भूमिका या वेळी गोरे यांनी मांडली.

आमदार बाबाजी काळे यांनी खेड तालुक्याच्या दुष्काळी भागातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी कळमोडीचे पाणी लवकरात लवकर मिळावे, अशी मागणी केली. बंद असलेली चाळीस गाव पाणी योजना व इतर विकासासाठी निधी मिळावा, अशी मागणी त्यांनी गोरे यांच्याकडे केली.

याप्रसंगी पाणी परिषदेचे निमंत्रक हेमंत हरारे, जयप्रकाश वळसे पाटील व सरपंच संतोष गोरडे यांनी पाणी परिषद आयोजित करण्याबाबतचा उद्देश सांगितला. या वेळी विविध गावांच्या सरपंचांनी पाणी प्रश्न लवकर सोडवण्याबाबत आक्रमक भूमिका मांडल्या.

या पाणी परिषदेला ग्रामविकास विभागाचे उपसचिव सुभाष झळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दोंडे, तहसीलदार प्रशांत बेंडसे, हेमंत हरारे, नायब तहसीलदार राम चोबे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, कनेरसरचे सरपंच सुनीता केदारी, वरुडे गावच्या सरपंच सुनीता पडवळ, गुळाणीचे सरपंच माऊली ढेरंग, वाफगावचे सरपंच नितीन लंगोटे, माजी सरपंच अजय भागवत, चिंचबाईवाडीचे सरपंच संतोष गार्डी , गाडकवाडीचे सरपंच वैभव गावडे आदी उपस्थित होते. या वेळी भाजपा व विविध संस्थांच्या वतीने गोरे यांचा सत्कार करण्यात आला. परिसरातील सरपंच व पदाधिकार्यांनी मंत्र्यांना विविध मागण्यांची निवेदने दिली.

# पुण्यात भावंडांवर टोळक्याचा हल्ला, तीक्ष्ण शस्त्राने सपासप वार

पुणे : राज्यात गुन्हेगारी वाढली असून, दररोज राज्यातील वेगवेगळ्या भागातून खून, मारामाऱ्या, दरोडे यासारख्या घटना घडत आहे. यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भिती निर्माण झाली आहे. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यातील धानोरीत वैमनस्यातून टोळक्याने भावंडांवर तीक्ष्ण शस्त्राने वार केल्याची घटना घडली आहे.



याप्रकरणी पोलिसांनी टोळक्यावर गुन्हा दाखल केला असून, एकाला अटक केली आहे.

पंकज कुमार आणि साहू कुमार (दोघेही रा. मुंजाबा वस्ती, धानोरी) अशी गंभीर जखमी झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी राजेश राधेश्याम गुप्ता (वय ४०, रा. धानोरी) याला अटक करण्यात आली आहे. त्याचे साथीदार नितीन गुप्ता (वय २५), आकाश गुप्ता (वय १९) यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत राहुल कुमार गौतम (वय २३ रा. मुंजाबावस्ती ) यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, पंकजकुमार आणि आरोपी गुप्ता यांच्यात काही दिवसांपुर्वी वादविवाद झाले होते. त्याचा राग गुप्ता कुटुंबीयांत होता. शुक्रवारी (२५ एप्रिल) रात्री गुप्ता यांनी पंकजवर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. त्यावेळी पंकजचा भाऊ साहूने भांडणात मध्यस्थी केली. टोळक्याने त्याच्यावरही शस्त्राने वार केले. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात पंकजकुमार व त्याचा भाऊ साहू हे गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलीस उपनिरीक्षक ताराचंद सुडगे तपास करत आहेत.

# शेतकरी कुटुंबातील रोहन क्लास वन

तळेगाव ढमढेरे : शेतकरी कुटुंबातील रोहन राजेंद्र पिंगळे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२४ मध्ये झालेल्या नागरी सेवा परीक्षेत ५८१ वी रँक मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले.



रोहन याचे प्राथमिक शिक्षण तळेगाव ढमढेरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले आहे. माध्यमिक शिक्षण येथील स्वातंत्र्यसैनिक रायकुमार गुजर प्रशालेत झाले. वडगाव बुद्रुक येथील सिंहगड कॉलेजमध्ये अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली. गुरुजनांचे मार्गदर्शन व आई-वडिलांनी दिलेली शिक्षणासाठीची संधी ओळखून रोहनने यूपीएससी परीक्षेत अभूतपूर्व यश मिळविले आहे.रोहनचे वडील व्यवसायाने वकील असून, शेती व्यवसायावर त्यांचा खूप विश्वास आहे. रोहनची आई गृहिणी असून, शेती व्यवसायात मातब्बर आहे. रोहनची बहीण एम. फार्मसी झाली आहे. शेतकरी कुटुंबातील रोहन यूपीएससी परीक्षेत यशस्वी झाल्याने कुटुंबासह नातेवाईक व ग्रामस्थांना आनंद झाला आहे.

# पोलीस स्टेशनमध्ये पूजा; पिंपरी चिंचवड पोलिसांकडून अंधश्रद्धेला खतपाणी? अंनिसने नोंदवला आक्षेप

पिंपरी चिंचवड शहरात कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलीस यशस्वी कधी होणार? गुन्हेगारांवर त्यांचं वचक कधी बसणार? शहरातील वाहनांची तोडफोड कधी थांबणार? छोट्या-मोठ्या लुटमारीच्या घटना अन उगवत्या भाईंकडून धमकवण्याचे प्रकार तरी थांबणार का? या प्रश्नांची उत्तरं शहरवासीयांना भेटत नसल्याची चर्चा आहे. पोलीस स्टेशनच्या पातळीवर या समस्या सुटत नाहीत म्हणून पोलीस आयुक्त विनयकुमार चौबेंनी 'एक्स' या सोशल मिडियावरून व्हर्च्युअली तक्रारी सोडवण्याची वेळ आली. आता तक्रारी ऑनलाईन सोडवाव्या लागणार असतील तर मग पोलीस स्टेशन कशासाठी? असा ही प्रश्न शहरवासीयांना पडलेला आहे. अशातच दापोडी पोलीस स्टेशनमध्ये चक्क सत्य नारायणाची पूजा घालण्यात आल्याचं समोर आलं आहे.

याच पोलीस स्टेशनच्या नूतन इमारतीचं उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या हस्ते लोकार्पण झालं. काल (शुक्रवारी) हा लोकार्पण सोहळा पार पडला, तत्पूर्वी पोलीस अधिकाऱ्यांनी ही पूजा घातल्याचं बोललं जातं आहे. मात्र आता यावर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्यकार्यकारिणी सदस्य मिलिंद देशमुखांनी यावर आक्षेप घेतले आहेत. मुळात पूजा कोणी आणि कुठं घालावी, हा प्रत्येकाच्या



श्रद्धेचा विषय आहे. पण शासकीय कार्यालयात अशा पूजा घालणं, हे बेकायदेशीर असल्याचं अंनिसने म्हटलं आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या घरी अशी पूजा घातली असती तर ती त्यांची श्रध्दा मानली गेली असती पण शासकीय कार्यालयात अशी पूजा घालून, पोलीस काय सिद्ध करु पाहतायेत? असा प्रश्न अंनिसने उपस्थित केला आहे. खरं तर समाजात कोणी अंधश्रद्धेला खतपाणी घातलं तर त्याविरोधात पोलीस स्टेशनमध्ये जाऊन दाद मागितली जाते. पण त्याच पोलीस स्टेशनमध्ये अधिकारी अशी पूजा घालत असतील तर अंधश्रद्धेविरोधात सर्व सामान्यांनी यांच्याकडे दाद मागितली तर तक्रारदाराला न्याय कसा मिळणार? असा ही प्रश्न अंनिसने उपस्थित केला आहे. बरं याकडे ज्यांनी लक्ष देणं गरजेचं आहे, ते पोलीस आयुक्त चौबे सध्या शहरवासीयांचे प्रश्न व्हर्च्युअली सोडवत आहेत. मात्र त्यांना आयुक्तालयाच्या हद्दीतील पोलीस स्टेशनमध्ये नेमकं चाललंय तरी काय? हे व्हर्च्युअली तर दिसणार नाही, हे आपल्याला मान्य करावं लागेल. पण ते समजून घेण्यासाठी पोलीस आयुक्तांनी सरप्राईज व्हिजिट करत, पोलीस स्टेशनमध्ये नेमकं चाललंय तरी काय? हे प्रत्यक्षात पाहण्याची गरज आहे. असं झालं तर कदाचित पोलीस आयुक्तांकडे 'एक्स' या सोशल मिडियावर येणाऱ्या तक्रारींचा सूर ही नक्कीच कमी होईल. फक्त गरज आहे ती इच्छाशक्तीची अन काटेकोर अंमलबजावणीची. सध्या या गोष्टीची जोरदार चर्चा सुरू आहे.

# पाकिस्तानी नागरिक बेपत्ता होण्याच्या अफवा निराधार; मुख्यमंत्री फडणवीस

पुणे : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री या नात्याने १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता होण्याच्या अफवा 'या' पूर्णपणे निराधार असल्याचे स्पष्ट केले आहे. ते पुणे येथे माध्यमांशी आज (दि.२७) संवाद साधत होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गृहमंत्री म्हणून मी स्पष्टपणे सर्वांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील अफवा पसरवू नयेत. सर्व पाकिस्तानी नागरिकांचे ठावठिकाण आम्ही शोधून काढले आहे आणि त्यांना महाराष्ट्रातून त्यांच्या देशात परत पाठविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ते पुढे म्हणाले, योग्य त्या सर्व व्यवस्था करण्यात येत असून, कोणताही पाकिस्तानी नागरिक येथे थांबणार नाही. माझा अंदाज आहे की, आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्याच्या सकाळपर्यंत सर्वजण भारतातून परत जातील. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या स्पष्टीकरणानंतर नागरिकांमध्ये पसरलेल्या संभ्रमाला पूर्णविराम मिळाला असून, प्रशासनाकडूनही अधिकृत हालचालींना गती देण्यात आली असल्याचे देखील ते म्हणाले.



cmyk